विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९४**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष सहावे / अंक ७ / जून २००५

## संपादकीय

### अपारंपारिक उर्जास्त्रोत

आपल्या समाजापुढे, शासनापुढे म्हणजेच पर्यायाने आपल्यासमोर काय प्रश्न आहेत, ते का झाले आहेत कसे सोडविता येतील याकडे माणसाचा कल असणे स्वाभाविक आहे. पारंपारिक उर्जा संपत जाणार आहे, ती कमी पडत आहे, असे जाणवल्यावर सौर उर्जेसारख्या अतिशय महत्त्वाच्या स्रोताकडे आप वळलो. पण उर्जेची गरज व सौर उर्जेचा आपण करत असलेला/नसलेला वापर यांचे प्रमाण इतके व्यस्त आहे की अपारंपारिक उर्जा स्रोतांपैकी एक महत्त्वाचा अशा स्रोताची आपण उपेक्षाच  करीत आहोत.

इमारतींनी पावसाचे पाणी साठविण्यासंबंधी कमी जास्त प्रमाणात विचार चाललेला दिसतो. या रेन वॉटर हार्वेस्टिंगचे गणित सौर उर्जेसारखे व्यस्त होऊन बसू नये ही मनोमन इच्छा ! पावसाच्या वाया जाऊ शकेल अशा पाण्याचा वापर हा जसा महत्त्वाच ठरेल तसाच सौर उर्जेचा वापर झाला तर? किती तरी प्रमाणात प्रश्न सोपे होतील.एक ख्यातनाम विद्यापीठाच्या  अभ्यागतगृहावर कैक लाख रुपये खर्चून पाणी गरम करण्याची सोय केलेली जेव्हा  पहाण्यात आली तेव्हा बरे वाटले. पण अभ्यासगृह जस जसे जुने होऊ लागले तस तसे या यंत्रणेचे बारा वाजत गेले. विद्यापीठासारख्या मोठ्या आस्थापनांचे जाऊ द्या, पण वर्षातील हिवाळ्यासारख्या ऋतुत, मोठ मोठ्या उपहारगृहात, इस्पितळांत गरम पाणी सतत व मोठ्या प्रमाणात लागते तेथे प्रत्येक ठिकाणी सौर उर्जेचा वापर करणे अनिवार्य ठरवले गेले तर इंधनासारखा मोठा प्रश्न अधिक सोपा होईल. सौर उर्जा मोठ मोठ्या वीज निर्माण प्रकल्पांसाठीही वापरली जायला हवी.

रेन वॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे सोपे आहे, पण भविष्यात या पाण्याचा, तोही सुयोग्य वापर होतो आहे हे पहात रहाणे ही आपलेच काम आहे. पाण्याचा थेंबही वापरण्या पूर्वी विचार करायला भाग पडेल, इंधन वापरण्यापूर्वी सौर चुलीसारखी काही पर्यायी उपकरणे आहेत का हा विचार मनात येईल असा संस्कारच आता करायला हवा. तरच अपारंपारिक उर्जास्रोतांचा मानवी समाजासाठी वापर होईल.

या 'अपारंपारिक उर्जा स्रोत' विषयाचे असंख्य पैलू आहेत. आमच्या महाविद्यालय परिसरात तंत्रनिकेतनात ऑगस्टमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या परिषदेतून या विषयाला चालना मिळून दैनंदिन जीवनात या विषयाचा प्रसार व्हायला मदत मिळेल !




**वर्ष सहावे / अंक ७ / जून २००५**


**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक १२ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | मूर्ती आणि मूर्तिपूजा | शं. बा. मठ | ३ |
| २) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने- ३ | यशवंत साने | ८ |
| ३) | आधुनिक मराठी कवितेचे जनक कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत (१८६६-१९०५) | आशा भिडे | १५ |
| ४) | माणुसकीचा पुरस्कार करणारी संत शिकवण | मनीष गराटे | २१ |
| ५) | मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यातील महानगरीय संवेदना | प्रा. प्रदीप कर्णिक | २३ |
| ६) | स्मृतिगंध - प्रेरणादायी लेखसंग्रह | मोहन पाठक | ३१ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# मूर्ती आणि मूर्तिपूजा

*सर्व चराचरात ईश्वर पहाणारी भारतीय संस्कृती. या संस्कृतीने मनातील ईश्वराला साकार रूप देतान मूर्त रूप देतांना ज्या मूर्ती या संस्कृतीत मान्य पावत गेल्या त्या विषयीची ही लेख माला. यातील पहिला लेख देत आहोत.*

*- संपादक*

(लेखांक पहिला )

**मूर्ती पूजेचे प्राचीनत्व :**

भारतात मूर्तिपूजा फार कालापासून प्रचलित आहे. बुद्ध अनुयायांनी गौतमाच्या निधनानंतर त्याच्या गौरवार्थ त्याची प्रतिमा करून पूजा करावयास सुरुवात केली. तेव्हा पासून मूर्तिपूजा अस्तित्वात आली असा काहीसा समज आहे. परंतु ज्ञात गोष्टीवरून त्याच्याही पूर्वीपासून भारतात मूर्तिपूजेची कल्पना अस्तित्वात असावी असे म्हणावे लागते. योग प्रक्रियेत ध्यान व धारणा या साठी कोणत्यातरी बाह्य गोष्टींचे आळंबन स्वीकारण्याची पद्धत होती आणि ही पद्धत फार जुनी आहे. पतंजली, धारणा याचा अर्थ चित्त एकाग्र करणे असा करतात आणि ही क्रिया एखाद्या बाह्य वस्तूवर केली असता हे सिद्ध होते. या साठी नाभिचक्र आणि हृदय ही आलंबने म्हणून स्वीकारण्यात आलेली होती. अशा प्रकारे ध्यानासाठी बाह्य वस्तूचे अवलंबन केले जात असे. 'योग प्रक्रिया' ही पतंजली पूर्वीपासून या देशात रुढ झालेली होती. याज्ञवाल्क्य म्हणतात, हिरण्यगर्भ नावाच्या थोर ऋषीने योग प्रक्रियेचा पाया घातला आणि पतंजलीने मागाहून सूत्रे लिहिली. '**हिरण्यगर्भ: योगस्य वक्ता न अन्य: पुरातन:** ।' हा आशय पतंजलीच्या पहिल्याच सूत्रातून 'अथ योगानुशासनम्' ध्वनित होतो. आता सांगितल्याप्रमाणे 'योगाचे आचरण करणे' असा त्याचा अर्थ आहे. रामानुजाचार्य याने हिरण्यगर्भ व त्याच्या शिष्य परंपरेतील वार्षगण्य, याज्ञवाल्क्य यांचा उल्लेख या संदर्भात केला आहे. श्रीमन् शंकराचार्य यांनी ज्या काही सूत्रांचा उल्लेख केलेला आहे ती सूत्रे पतांजल योग सूत्रात नाहीत. यावरून पातंजल सूत्राच्या पूर्वी पासून बाह्य आलंबनाचा उपयोग अगदी पुरातन कालापासून होत आला आहे. गौतमाला देखील त्याच्या पूर्ववयात परंपरेप्रमाणे योगाचे धडे देण्यात आले होते. मागाहून तो बुद्ध झाला. आणि सत्य ज्ञान झाल्यामुळे लोक त्याला बुद्ध देव म्हणू लागले. फार पूर्वी पासून ध्यानासाठी माध्यम वा आलंबन या स्वरुपात चिन्हांचा वा वस्तूंचा अवलंब केला जात असे हे ध्यानात येईल. आणि हेच मूर्तिपूजेचे मूळ स्वरूप होते. पुढील काळात प्रत्यक्ष मूर्तिपूजा यातूनच उदयाला आली. आजही मूर्ती परमात्म दर्शनाचे माध्यम म्हणूनच पाहिले जाते.

पाणिनीच्या सूत्रातून मूर्तीबद्दल स्पष्ट उल्लेख केलेला आहे. उपजिविकेसाठी वा विक्रीसाठी मूर्तीचा वापर करु नये असे म्हटले आहे. एखादी व्यक्ती ज्या प्रतिमेची पूजा करीत असेल त्याला त्या नावाने ओळखले जात असे असाही उल्लेख आढळतो. यावरून पाणिनीकाळी देव देवतांच्या प्रतिमा अस्तित्वात होत्या असे म्हणावे लागेल. त्याच्या निरुक्त ग्रंथात देवता विषयक वर्णन आहे. '**तिस्रो देवात**' - देवता तीन प्रकारच्या संभवतात, इत्यादी. रामायणात लंकेमधील देवतांचे वर्णन आले आहे. त्या वेळी देवळातून मूर्तिपूजा होत असावी. विशेषतः दक्षिण भारतात मूर्तिपूजा असावी असे म्हणण्यास हरकत नाही. वैदिक काळी देखील मूर्तिपूजा अगदीच अवगत नव्हती असे नाही, असे म्हटले तरी चालेल. रुद्राध्यायात

'या ते रुद्र शिवातनूरघोराकाशिनी' तनू इथे शरीर या अर्थी आहे. हे रुद्रा तुझी काया कल्याणदादी, सौम्य व पवित्रता दर्शविणारी आहे.

**शिल्पकलाही प्राचीनच :**

शिल्पा संबंधी विचार करावयाचा झाल्यास अगदी प्राचीनशिल्प हे दक्षिण भारतातील 'गुडिमल्लम्' येथील लिंग मानावे लागेल. या लिंगाचे एकंदरीत रुप, त्याजवरील आभरणे व कोरीव काम या साऱ्या गोष्टींवरून असे मानले जाते की हे शिवलिंग ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकातील असावे. यावरून लिंग पूजा आणि शिव दैवत या संबंधीचा काळ ध्यानात येण्यास मदत होते. अलीकडेच बेसनगर येथील कोरीव ध्वजस्तंभाचा शोध लागलेला आहे. हा गरुड स्तंभ डायोनचा मुलगा हेलिआइरस याने अमलकीदास या राजाच्या कारकीर्दीत वासुदेव गौरवार्थ उभा केला आहे. हा एक भगवद्‌भक्त होता. तो दक्षिणेहून इथे आला होता व त्याने हा ध्वजस्तंभ उभा केला. या राजाचा काळ ख्रिस्तपूर्व १७५ व १३५ असा मानला जातो. हा पुरावा अलीकडेच प्राप्त झाल्याने विष्णूला वासुदेव म्हणत व त्याची पूजा हिंदुस्थानात ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकाच्या आधीपासून प्रचलित होती असे मानावे लागते.

**विविध वस्तूजातींची पूजा :**

पूजेसाठी विविध प्रकारच्या मूर्ती होत्या. या विविध प्रकारात देवदेवतांच्या पाषाण मूर्ती तसेच शालिग्राम, बाणलिंग यंत्र, काही पक्षी, काही वृक्ष, काही नद्या, सरोवरे, तळी, साधुसंतांच्या प्रतिमा अगर पुतळे, जन्मस्थाने आणि या शिवाय छोट्या मोठ्या वस्तू, पूजा विषय बनलेल्या आढळतात. यातील काही गोष्टी बाबतचा परामर्श या लेखात घेण्याचे ठरविले आहे.

**१ मूर्ती -**

देव आणि देवता यांच्या मूर्ती - यातही दोन प्रकार संभवतात. वैष्णव संप्रदाय व शैव संप्रदाय. मात्र या दोनही पंथात काही देवतांच्या मूर्ती समान आढळतात. उदाहरणार्थ देवी-उमा, दुर्गा, काली इत्यादी, तसेच गणपति व त्याचे प्रकार. मुख्य देवता मात्र संप्रदायाप्रमाणे विष्णु अगर विष्णूचे अवतार, त्याच प्रमाणे शिव अगर शिवाचे अवतार असल्याचे आढळते. शाक्त पंथियांत शिवपूजा व शक्तिपूजा प्रचलित असल्याने या दोन्ही संप्रदायाच्या मूर्तीत त्याचा समावेश होतो. मूर्तींचे पूजन केवळ देवळातच होते असे नसून घरोघरी आपआपल्या कुलाचाराप्रमाणे देवता पूजन केले जात असे. सांप्रतही कुल परंपरेप्रमाणे इष्ट देवतांची पूजा व आराधना केली जाते.

**२ शालिग्राम -**

हा एक काळा कुळकुळीत दगड होय. नदीच्या पात्रात सतत घरंगळत असल्याने त्याला गोल आकार व गुळगुळीतपणा प्राप्त होत असतो. अशा प्रकारचे दगड गंडकीच्या पात्रात विपुल प्रमाणात आढळतात. या दगडाला एखादे छिद्र असते. ह्या छिद्रातून आतील बाजूला कोरले गेलेले चक्र पाहावयास मिळते. आणि हे चक्र विष्णूच्या हातातील चक्राचे प्रतिनिधित्व करते असा समज असल्याने 'शालिग्राम' हे विष्णूचे प्रतीक मानून त्याची पूजा केली जाते. याबद्दल वराह पुराण अध्याय १४४ मध्ये एक आख्यायिका आढळते. थोडक्यात ह्या आख्यायिकेचा सारांश या प्रमाणे आहे. गंडकीने दीर्घ तपश्चर्या केली. साक्षात भगवान विष्णू प्रसन्न झाले आणि तिला वर मागण्यास सांगितले. गंडकी प्रकट होऊन विष्णूला म्हणाली - भगवन् मजवर अनुग्रह करावयाचे आपण ठरविले असाल, तर माझ्या पोटी पुत्र या नात्याने जन्म घ्यावा. विष्णूने यावर विचार करून तिला सांगितले - हे देवी मी तुझ्या उदरी शालिग्राम स्वरुपात जन्माला येईन.

माझ्या सान्निध्याने तुझी श्रेष्ठ नदीत गणना होईल. व तू सर्व प्रकारचे पाप हरण करणारी होशील. इतके सांगून भगवान् विष्णू अंतर्धान पावले. या बाबतीचे संस्कृत श्लोक खाली उद्धृत केले आहेत -

दिव्य वर्ष व्रतं तेपे विष्णुं चिन्तयती तदा ।

ततः साक्षात् जगन्नाथ हरिभक्तः जन प्रियः ।

उवाच मधुरं वाक्यं प्रीतः प्रणतवत्सलः ।

गण्डकी त्वां प्रसन्नोऽस्मि तपसा वि स्मितोऽनदो ।

अनविछिन्नतयाभक्त्या वरं वरय सु व्रतो ।

ततो हिमांशो सा देवी गंडकी लोकसारिणी ।

प्राञ्जलिः प्रणताभूत्वा मधुरं वाक्यं अब्रवीत् ।

यदि देव प्रसन्नोऽसि देयो मे वांछितो वरः ।

मम गर्भ रातो भूत्वा विष्णो मत् पुत्रतां व्रज ।

इत्येवं कृपया देवो निश्चित मनसा स्वयम् ।

गण्डकीं अब्रवीत् प्रीतः श्रुणुदेवि क्चोमम ।

शालग्राम शिला रुपी तवगर्भगतः सदा ।

स्थास्यामि तव पुत्रत्वे भक्तानु ग्रहकारणात् ।

मत् सान्निध्या तदानीं त्वं अतिश्रेष्ठा भविष्यसि ।

हरिष्य सि महापापं वाङ्मनः काम संभवम् ।

एवं दत्वा वरान् देव्यै तत्रैव अन्तरर्धायत ।

शालिग्राम वैष्णव व वैदिक शैव पूजतात. आगमिक शैव तसेच वीरशैव आणि शाक्तपंथी याचे पूजन करीत नाहीत.

### ३ बाणलिंग -

हा बहुधा स्फटिकाचा असतो. तसेच याचा आकार अंडाकृती असतो. त्रिलोचन शिवाचार्य यांनी आपल्या सिध्दांत सारावळीत बाण हे शिवाला अतिशय प्रिय आहे असे म्हटले आहे. या बाणाचे छोटे मोठे आकार संभवतात. एक इंचापासून तो एक हात लांब इथपर्यंत बाण आढळतात. बाण विविध रंगाचे असतात. जांभळा, मधाळ, काळा आणि वर्खाच्या दगडा सारखा. 'गोमुख' अगर अंडाकृती आकाराचा बाण चांगला मानला जातो. बाणाचे पीठ आसन बाणाच्या रंगाचे असले पाहिजे असा संकेत आहे. हे बाण नेपाळात महेन्द्र पर्वतावर अमरेश्वर येथे असलेल्या कन्यातीर्थात आणि आश्रमाच्या आसपास विपुल प्रमाणात मिळतात. येथे अक्षरशः करोडो बाण लिंगे आहेत. अशा प्रकारचे बाण लिंग श्रीशैलम इथेही विपुल प्रमाणात मिळतात. या बाणाची स्थापना करून पूजा केली जाते. काश्मीर येथे आद्य शंकाराचार्य यांनी एका टेकडीवर बाणलिंग स्थापित केला आहे. तो मधाळ रंगाचा असून दोन फूट उंचीचा आहे. त्यावर सुंदर मंदिर उभे केले आहे. त्याला आजही 'शंकाराचार्य टेकडी' असेच नांव आहे.

### ४ यंत्र -

रहस्यमय व गूढ आकृतींच्या आलेखाला यंत्र म्हणतात. शाक्त पंथियात याचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. हा आलेख विशिष्ट प्रकारच्या धातूच्या पत्र्यावर अगर केवळ कागदावरही रेखाटला जातो. तो रेखाटताना त्यात काही गूढ अक्षरांचा समावेश करण्यात येतो. या आलेखात सर्व प्रकारचे अशुभ नष्ट करण्याचे सामर्थ्य असते असा समज आहे. म्हणूनच साधक दैवी शक्ती मानून यंत्राची पूजा करतो आणि इच्छित मनोकामना प्राप्त करुन घेतो. काही वेळा हे आलेख एका लहानशा सोन्याच्या अगर चांदीच्या ताईतात दुमडून बंद केले जातात व तो ताईत साधक गळ्यात वा दंडावर बांधतो. या आलेखात अतिशय पवित्र व श्रेष्ठ आलेख हा श्रीयंत्राचा मानला जातो. या यंत्राचे महत्त्व आजही मानण्यात येते. दैवी भावनेने या यंत्राची पूजा केली जाते. सौंदर्यलहरीत

या यंत्राबद्दल विशेष माहिती मिळते.

५ गोमाता -

सर्व प्राण्यात 'गाय' ही पवित्र मानली जाते. गायीत सर्व देवता वास करतात असा समज आहे. पृथ्वीला आपण माता मानतो. पृथ्वी गोरूप धारण करून देवादिकाना संकट काळी विनविते असा उल्लेख पुराणांतही आढळतो. यामुळे गाय ही पृथ्वीमाते इतकीच पवित्र मानली गेली आहे. म्हणून तिला 'गोमाता' असे म्हणण्यात येते. गायीची नित्य पूजा केली जाते. काही महत्त्वाच्या प्रसंगी तिची विशेष पूजा केली जाते. विशेषतः 'वसुबारस' या दिवशी (आश्विन कृष्ण द्वादशी) सवत्स धेनूची पूजा केली जाते. प्रत्येक गाय ही 'कामधेनू' कल्पून त्या स्वरुपात ती पाहिली जाते. भगवान श्रीकृष्णाने गायीचे महत्त्व ओळखून तिच्या रक्षणाचे काम केले. त्यामुळेच त्याचे नाव गोपालकृष्ण म्हणून रुढ झाले. आजही काही मंदिराच्या ठिकाणी पूजेसाठी मुद्दाम गायी आणल्या जातात.

६ खग -

सर्व पक्ष्यांत 'वैनतेय' (विनितापुत्र) म्हणजे गरुड पक्षी मानला जातो. त्याला 'विष्णूचे वाहन' असे म्हटले जाते. या पक्ष्याचे दर्शन पवित्र मानले जाते. काही देवळाच्या खांबावर वा प्रवेश द्वारापाशी गरुड आणि हनुमंत या उभयतांची जोडी विशेषतः विष्णुमंदिरात पाहावयास मिळते.

७ नदी -

गंगा, गोदावरी, कावेरी आदी नद्या अत्यंत पवित्र मानल्या गेल्या आहेत. रोज पूजेच्या वेळी या सर्व नद्यांचे स्मरण आवर्जून करण्यात येते. या पूजेच्या तांब्यात या नद्यांच्या पात्रातील जल एकत्र होवो अशी प्रार्थना केली जाते.

'गंगेच यमुने चैव गोदावरी सरस्वती ।
नर्मदे सिंधु कावेरी जलेऽस्मिन् संनिधिं कुरु ।'

या वेळी कलशावर हात ठेवून सर्व पात्रांचे जल मी पूजेसाठी घेत आहे असा भाव पूजा करणाऱ्याच्या मनात निर्माण होतो. या स्मरणाने न कळत संपूर्ण भारत देशाची एकता तो व्यक्त करत असतो. ही भावनिक एकताच चिरकाल टिकणारी गोष्ट आहे. विशेषतः 'गंगा' ही भारतातील सर्व नद्यात श्रेष्ठ आणि अति पवित्र नदी मानली जाते. तिच्या बद्दल सर्व भारतीयांना आतीव आदर आहे. ती पूजनीय आणि वंदनीय आहे. तिच्यात स्नान करण्यास मिळणे महत् भाग्य मानले जाते. कुंभमेळा, पर्वकाळ इत्यादी प्रसंगी लाखो भारतीय या पवित्र नदीत स्नान करतात. याच प्रमाणे काही मोठाली तळी पण पवित्र मानली गेली आहेत. उदाहरणार्थ कुंभकोणम् येथील तळे त्या पैकीच एक आहे. प्रत्येक बारा वर्षांनी माघमासातील मघा नक्षत्राच्या वेळी तिथे मोठी यात्रा भरते आणि महामख या नावाने उत्सव साजरा केला जातो. भारतीय माणूस प्रत्येक नदीलाच गंगा मानतो आणि स्नान करताना गंगेचे स्मरण करतो. पूर्वी स्नानासाठी गंगाळ असे. या शब्दावरून (गंगेचे आळे) गंगामाईचे स्मरण व्हावे हाच हेतू होता. नदी पूजन आजही भक्तिभावाने केले जाते.

८ वृक्ष -

सर्व वृक्षात 'अश्वत्थ' अति पवित्र मानला गेला आहे. बुद्ध धर्मियात या वृक्षाला पवित्र मानण्यात येत असते. याच वृक्षाच्या छायेखाली गौतमाला सत्य ज्ञान झाले. त्यालाच 'बोधिवृक्ष' म्हणतात. संसाराला अश्वत्थ वृक्षाची उपमा देऊन श्रीकृष्णाने या वृक्षाची महती विशेषत्वाने वाढविली आहे. 'ऊर्ध्वमूलं अधःशाखं अश्वत्थं प्राहुरव्ययम्' गीता १५.१. दक्षिण भारतात काही देवळातून ठराविक वृक्ष लावले जातात. त्याला स्थळवृक्ष असे म्हणतात. मदुरेत कदंब वृक्ष तर त्रिचनापल्लीत जंबुवृक्ष

हा स्थळ वृक्ष मानला जातो. काही देवतांचे वृक्ष प्रसिद्ध आहेत. दत्त व औदुंबर यांची सांगड घातलेली आहे. खदिरवृक्ष-यज्ञीय धूप याच झाडाच्या फांद्यापासून वेदकाळापासून करण्यात येत असे. तुळशीचे रोपटे विष्णू मंदिरात असलेच पाहिजे. पूर्वी प्रत्येकाच्या अंगणात तुळशी वृंदावन असे. तुळशीची नित्य पूजा करण्यात येत असे. अद्याप कार्तिक शुध्द द्वादशीला 'तुळशी विवाह' समारंभ साजरा केला जात असतो. तुळस विष्णुला प्रिय तर बिल्वपत्र शंकाराला प्रिय. ज्याला जी वस्तू प्रिय असते ती त्याला दिली असता देवता प्रसन्न होतात हे ओळखून आपल्या पूर्वजांनी देवता व वृक्ष यांची मनोज्ञ सांगड घातलेली आहे.

९ विभूती -

थोर संत महात्मे ज्या स्थानी जन्मले ती स्थाने पवित्र मानली गेली. अथवा ज्या स्थानी या थोर लोकांनी देह ठेवला ती पुण्यक्षेत्रे झाली. आळंदी येथील ज्ञानदेवांची समाधी याच कारणामुळे पवित्र मानली जाते. काही ठिकाणी प्रतिमा, पुतळे यांची स्थापना केली जाते. पंढरपूरला पुंडलिकाचे - प्रसिद्ध वैष्णव भक्ताचे - मंदिर आहे. विठ्ठल दर्शनासाठी पंढरीस जाणारी मंडळी पुंडलिकाचे देखील दर्शन घेतात.

सर्वत्रच भगवंताचे अधिष्ठान -

वरील नानाविध स्वरूपात भगवंताची अर्चना केली जाते, त्यामुळे प्रत्येक वृक्ष, प्रत्येक नदी, प्रत्येक गाय, प्रत्येक संत आणि महंत यांचे जन्म वा मृत्यू स्थाने हे पवित्र आणि पूजनीय मानले गेले आहे. या सर्वांबद्दल अतीव आदराची भावना प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणात आजही कमी अधिक प्रमाणात आढळते. हिंदु मन हे मूर्ती पुजेत रमणारे आहे. हे यावरून स्पष्ट होईलच. ती मूर्ती कोणत्याही स्वरूपात असो ती त्याच्या दृष्टीने पवित्रच असते.

या संदर्भात गीतेतील दहावा अध्याय (विभूती योगचा) पाहण्यासारखा आहे. त्या अध्यायात असे वर्णन आढळते. बारा आदित्यां मधे विष्णू मी, तेजस्वी वस्तूत सूर्य मी, नक्षत्रात चंद्र मी, देवांमध्ये इंद्र मी, इंद्रियांमधे मन मी, सर्व प्राण्यात चैतन्य मी, अकरा रुद्रांत शंकर मी, यक्ष राक्षसात कुबेर मी, सर्व पर्वतामधे मेरु पर्वत मी, सर्व पुरोहितात बृहस्पती मी, सर्व सेनापतींमधे स्कन्द मी, सर्व जलाशयात समुद्र मी, वाणीमधे ॐकार मी, यज्ञात जपयज्ञ मी, स्थावर वस्तूत हिमालय मी, सर्व वृक्षात अश्वत्थ मी, सर्व देवर्षीत नारद मी, गंधर्वांत चित्ररथ मी, सिध्दांमध्ये कपील मुनी मी, सर्व नरात नाराधिप म्हणजे राजा मी, सर्व सर्पांत वासुकी मी, सर्व पशूत सिंह मी, सर्व पक्षात गरुड मी, सर्व नद्यांत गंगा नदी मी, सर्व हरण करणारा मृत्यू मी, महिन्यात मार्गशीर्ष महिना मी, ऋतूत वसंत ऋतू मी, तेज मी, वासुदेव मी, सर्वज्ञ मी, सर्वांत जे बीज भूत आहे ते बीज मी आहे. माझ्या विस्ताराला अन्त नाही. जे जे तेजस्वी व प्रभावयुक्त आहे ते सारे काही माझ्या अंगापासून उत्पन्न झाले आहे.

भगवंताचा विस्तार सर्व विश्व व्यापून असल्याने प्रत्येक वस्तूत भगवंताचे आधिष्ठान पाहण्याची दृष्टी भारतीय संस्कृतीत निर्माण झाली आहे.

(क्रमशः)

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा तिसरा लेख. विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

(भाग ३)

**पूर्वसंदर्भ -**

आपल्या 'दिशा' ह्या मासिकांतल्या दोन लेखात आपण थोड्याशा विस्कळीतपणे का होईना पण भारतीय संस्कृतीच्या काही वैशिष्ट्यांचा उल्लेख व मांडणी केली.

**सेक्यूलर संस्कृति -**

पण 'संस्कृती' हा विषय, युरोपियन किंवा पाश्चात्य वैचारिक पद्धतीत, एका विवक्षित धारणेत, हाताळला जातो आहे. ती धारणा 'भौतकवादी' बहुतांशी तर आहेच, आणि शिवाय 'संस्कृती' हा एक Social Sciences चा व Social History - समाजशास्त्र व सामाजिक इतिहासाचा विषय आहे, अशी ती मांडणी आहे. तिचा तत्त्वज्ञान व धर्म यांच्याशी असलेला संबंध ही एक ऐतिहासिक 'तात्कालिकता' व धर्माच्या संबंधाबाबतीत तर संस्कृतीचा बुद्धीवाद व तार्किकता व वैज्ञानिक सत्यता ह्या दृष्टीने झालेला, एक धर्माशी टळावा असा 'असंग', असे वातावरण व भूमिका आहे.

**बीजापासून फारकत -**

हे कृत्य म्हणजे भापेला आपल्या बीजापासून व एका मोठ्या संस्कृतीपासून तोडण्यासारखे आहे. ते इंग्रजी शिक्षणाचे हेतूच होते. भारतात जवळजवळ याच विचारधारेची छाप विद्वानांवर आहे. यामुळेच 'भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांकडे व त्याच्या 'वैदिक बीजाकडे' नुसत्या असहानुभूतीनेच नव्हे, तर अन्यायाने बघितले जात आहे.

**नॅशनल कल्चर आबिद हुसेन -**

डॉ. एस्. अबिद हुसेन यांच्या "The National Culture of India" या पुस्तकात भारतीय संस्कृती म्हणजे इस्लाम, ख्रिश्चन व इतर आक्रमक संस्कृत्यांचा सरमिसळ पद्धतीने जी 'एक भेळपुरी संस्कृती' निर्माण झाली, तीच त्या देशाची, समाजाची 'राष्ट्रीय संस्कृती' असा भाव निर्माण करण्यात आला आहे. 'सर्व धर्म समभाव' वगैरे जे वरवर सज्जनांचे समन्वयाचे गोंडस स्वरूप (व अशास्त्रीय बैठक) ह्या 'भेळपुरी संस्कृती' ला बहाल करण्यांत आले आहे, ते एका राजकीय धोरणातून निर्माण झालेले आहे व तसाच पाठिंबा त्या वेळच्या राजकीय सत्ताधारांनी व विचारवंतांनी अबिद हुसेन यांना जाहीरपणे दिला आहे. त्यांना १९५६ मध्ये साहित्य अॅकेडेमी अॅवॉर्ड व 'पद्मविभूषण' देण्यात आले होते.

**भेळपुरी संस्कृती -**

पण, प्रश्न हा आहे की १०,००० वर्षे या 'पवित्र भूमीवर' जी वेदप्रणित संस्कृती प्राणापलीकडे जपण्यात आली आहे - म्हणजे तिच्या 'बीजधारणेला व संदर्भाला' जी संस्कृती सतत समन्वय व आदर करत आली आहे. तिला काही भौतिकवादी व अदूरदर्शी राजकारण्यांनी आपल्या तोकड्या विचारधारेतून एका 'भेळपुरी' संस्कृतीचा 'आकार', द्यावा हे योग्य आहे का ? हे असे कां घडते

आहे ? हे आपण तटस्थपणे पहाणार का ?

**संस्कृतीचे विज्ञान -**

ह्याचे मुख्य कारण म्हणजे कुठल्याही संस्कृतीचा उदय कसा होतो ह्याचा शास्त्रीय अभ्यास नाही. तसेच त्या संस्कृतीचा फुलोरा व वाढ, तो समाज, कुठल्या प्रेरणेने करतो त्याबद्दल विद्वांनामध्ये 'अनभिज्ञता' आहे असे वाटते. ज्याला 'परतत्वस्पर्श' आणि 'अव्यक्त जगातील नात्याचा संबंध आहे. त्या संस्कृतीचे मोजमाप Reductionivise 'रिडक्शनवादी' व भौतिकवादी करुंच शकणार नाहीत.

उदाहरणार्थ, मानवी जीवन या पृथ्वीवर कसे अवतरले - त्या जीवनाचा इतर सृष्टीशी काय संबंध आहे- जीवनाच्या धारणेसाठी आणि जीवन जास्त कलात्मक, रसयुक्त व जीवाच्या प्रेरणाशक्ती सृष्टी किंवा प्रकृतीच्या जीवनव्यवहाराशी 'एकात्म' नाते संबंध ठेवून कशी राहील, याचा विचार केला जात नाही. जीवनमूल्यांची विवक्षित संस्कृतीच्या धारेमध्ये उत्पत्ती कशी व का होते याचा विचार एकतर कुठल्यातरी 'प्रॉफिटच्या' (मानवी देहधारी) विचारांतून - धर्मातून केला गेला आहे किंवा भौतिकवादी 'लोकायत' व मार्क्सिस्ट पद्धतीने, केवळ इतिहासवादी समाजशास्त्राच्या रोखाने केला गेला आहे. (Ref. 'Lokayat' by Com Debi Prasad Chattopadhyaya) ह्या जीवनमूल्यांचा वैश्विक रचना, नियम व हेतू यांच्याशी कोणता संबंध आहे, याचा विचार अजिबात नाही.

**वैश्विक मानवी संस्कृती (सनातन)**

हे सांगण्याकरिताच आपण मागच्या दोन लेखांत या विश्वाचे 'व्यक्त' व 'अव्यक्त' स्वरूप हे 'Objective Truth' (सनातन सत्य) काय आहे हे सांगण्याचा उपद्व्याप केला आहे. कारण, या उलट हे जग फक्त 'दृश्य' आहे तेव्हढेंच व आपल्याला म्हणजे मर्त्य मानवालाच फक्त जे दिसते आहे, त्यालाच 'अंतिम सत्य' मानतऱ्हा 'मूल्ये व संस्कृतीचा' विचार पाश्चात्यांकडे केला गेला आहे. मानव काय किंवा इतर जीवन काय ह्या पृथ्वीवर एक वैश्विक 'चैतन्य' त्याचा उदय व अभिव्यक्ती व त्याचे विशिष्ट नियम आणि मर्यादा त्यावर चालते. एवढेंच नव्हे, तर त्या जीवनाला खुद्द स्वतःलाही स्वतःच्या अस्तित्वाबद्दल पुरती जाण नसते, याचे भान आपण ठेवत नाही. दुर्दैवाने आवश्यकही वाटत नाही !!

अर्थातच, अश्या अपुऱ्या ज्ञानामध्ये जेव्हा जेव्हा प्रकृतीच्या, विश्वाच्या 'अव्यक्त जगाच्या' शक्तींचा खेळ, व्यापार ह्यांचा अविर्भाव, संक्रमण किंवा रसात्मक अभिव्यक्ती होते, तेव्हा आश्चर्य, अचंबा व धक्का ह्याखेरीज कुठल्याच ज्ञानप्रक्रिया दिसत नाहीत.

**सांस्कृतिक मॉडेलस्**

आपण, आता ह्या तऱ्हेचा 'generalisation' सर्वसामान्यीकरणाच्या विचारापेक्षा थोड्याशा तपशीलात जाऊन त्याचा विचार करुंया.

सामान्य कौटुंबिक व्यवहारामध्ये नवजात अर्भकाला आपण कुठल्या एका नावाने संबोधित करू इच्छितो व तसे नांव ठेवतो. ह्या स्वातंत्र्याबद्दल भौतिक समाजशास्त्रात किंवा राज्यशास्त्रात काही निर्बंध किंवा योजना आहेत का? या जीवाला पुढे 'फोटो-आयडेन्टेटी कार्ड' व पासपोर्ट व रेशनकार्ड काढावे लागेल व प्रत्येक नाक्यावर, शिक्षणक्षेत्रात, नोकरी धंद्यात व पार्लमेंटच्या इलेक्शनसाठी ह्या 'व्यक्तिमत्त्व परिचय' किंवा 'Identity' आयडेन्टीटीची गरज आहे, नव्हे, सक्ती आहे !!

**नामकरण संस्कार**

पण, भारतीय वैदिक संस्कृतिमध्ये ह्या अर्भकाला 'संस्कार विधिची' आवश्यकता सांगितली आहे. हा 'संस्कार' आहे. जातकर्मसंस्काराविधीमध्ये त्याच्या कानामध्ये 'वेदोसीति' - तुझे गुप्त नाव वेद आहे हा व इतर

नऊ मंत्र आहेत त्यांचा उच्चार करावा लागतो. ज्या जागेवर त्या बालकाचा जन्म झाला तिथे खालील मंत्र म्हणला जातो.

**'ओं वेद ते भूमि हृदयं दिवी चन्द्रमसि श्रितम् ।**
**वेदाहं तन्मां तद्विद्यात्पश्येम शरदः शीतं जीवे।**
**शरदः शतं् श्रृणुयाम शरदः शतम् ॥ १॥**
**(पार. गृ. कां १/कं. १६/सू. १७)**

तसेच 'नामकरण संस्कार' विधीमध्ये ज्या तिथी ज्या नक्षत्रावर बालकाचा जन्म झाला त्या तिथीचे व त्या नक्षत्राचे नांव घेऊन त्या देवता (Cosmic Energy) ह्यांना आहुती द्यावी लागत होती.

मी नमुन्यादाखल या दोन संस्कारांच्या तुटक असा उल्लेख करतो आहे. पण, त्यांतील आशय महत्वाचा आहे.

ज्या अनंतकोटी अनंत ब्रह्मांडामध्ये (आधुनिक विज्ञानही या विश्वाच्या अफाट अस्तित्वाबद्दल शंका घेत नाही आहे) त्या विश्वात ह्या पृथ्वीवर व वैश्विक कालगणनेनुसार (ब्रह्माची कालगणना - इसवी सन म्हणजे येसूख्रिस्ताच्या जन्मापासून सुरु होणारी कालगणना नव्हे) त्या क्षणी - कालक्षणी-नक्षत्रे व तारे यांच्या 'Lighthouse' (लाईटहाऊस जसे जहाजाला दिशा दाखवते) त्या किरणांच्या दिशेने व्यक्तिमत्त्व व नांव बहाल करण्यात येत- समारंभ व संस्कारयुक्त, हे महत्वाचे आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ह्या नांवाने बालकाच्या नांवाचे आद्याक्षर व इतर तपशील एका 'मातृकाशक्तीच्या' विज्ञानाच्या आधारावर नेमले जाते.

**संस्कृत भाषा हे साधन -**

संस्कृत भाषेची बीजाक्षरे ही प्रत्येक वैश्विक शक्तीच्या स्पंदावर - (Frequency) वर आधारलेली आहेत. हे आपण 'शिवसुत्रामध्ये' पाहिले आणि म्हणूनच भविष्यशास्त्रातही ह्या नांवाच्या आधारावर ह्या बालकाचा जीवनप्रवासाचा मार्ग तपासता येतो अशी 'अफाट' योजना आपल्या वैदिक ऋषी मुनींनी आखून दिली होती. आज हे ज्ञान नाहीसे झाले आहे. उपचार फक्त मागे राहिला. पण, हे ज्ञान पुन्हा आपल्या पायावर उभे करता येणे शक्य आहे. तरीपण- मग, आधुनिक 'फोटो आयडेंटिटी' जास्त शास्त्रीय की हे नामकरण ? कारण, फोटो फक्त देहाचा, पण जीवाला म्हणजे त्या कॉशसनेस-आत्म्याला 'आयडेंटिटी' ही त्याच्या वर्णावरून, गोत्रावरून, 'स्मृतीवरून' (स्मृतीचा गीतेतला अर्थ) प्राप्त होते व त्याचा 'देशकाल उच्चार' प्रत्येक देवपूजा, प्रार्थनांच्या वेळी करून हा 'वैश्विक पासपोर्ट' दाखवावा लागतो. कोणती पद्धती ही वैज्ञानिक हे आपणच ठरवा. पण इतकी शास्त्रशुद्ध पद्धती आज उध्वस्त करून ठेवण्यांत आली आहे.

या लेखमालेच्या माध्यमातून जगातील मानवी समाज हा कुठल्या सांस्कृतिक ध्येयाची वाटचाल करीत आहे. त्याची जिवंत उदाहरणे देत देत - जगातल्या महत्त्वाच्या दोन संस्कृतिमधील गुणात्मक फरक दाखवून देण्याचा एक छोटासा प्रयत्न मी करणार आहे.

**संस्कृतीची निद्रितावस्था - मृतावस्था -**

आतापर्यंतच्या लिखाणावरून एक गोष्ट नक्कीच ध्यानात आली असेल की पाश्चात्य भौतिकवादी, चंगळवादी चार्वाक वा 'विश्वामित्री बाण्याच्या' वैज्ञानिक संस्कृतीचा परिचय आपल्याला आहेच. मग, '**भारतीय संस्कृतीचे**' जे चित्र मी काढत आहे ती कुठे प्रत्यक्ष किंवा जिवत व्यवहारात दिसत नाही आहे. हे खरे आहे !!

भारतीय संस्कृती आपल्या मूळ स्वरूपापासून उध्वस्त झाली आहे. त्याचे उघड कारण म्हणजे परकीय राजसत्तेची आक्रमणे, भौतिकवादी संस्कृतीने आध्यात्मिक संस्कृतिचा तलवार व बंदूक यांच्या जोरावर गळा घोटलेला - अशी अवस्था आहे, आणि पिढ्या न पिढ्या संस्कृतीचे वहन करणाऱ्या संस्थांच्या, संहितांचा विध्वंस ही उघड कारणे

आहेत. त्याचबरोबर, स्वतःच्या आत्मसंस्कृतीचा भारतीयांना किंवा 'आर्यांना' पडलेला विसर व त्या संस्कृतीचा पुनःउध्दाराबद्दल अनुत्सुकता हे होय !! मी जेव्हा 'आर्यांचा' उल्लेख करतो तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटेल. त्याचा खुलासा सावकाश, यथोचित करणार आहेच.

**संस्कृतीतला भेद**

पण, तत्पूर्वी थोडे अगोदर आपण सामान्यपणे पृथ्वीवर एखाद्या जन्मलेल्या जीवाच्या व्यक्तिमत्वाची खूण म्हणून नांव ठेवण्याचा जो कार्यक्रम चालतो, त्यांतील फरक पाहिल्यावर ह्या दोन संस्कृतीतील भेद उघड व्हावा.

पाश्चात्य संस्कृती ही 'प्राणी जीवनासारखीच' समोर दिसणाऱ्या जड दृश्य व अदृश्य (व्यक्त आणि अव्यक्त नव्हे) ह्या 'इंद्रियजन्य ज्ञानावर' पूर्ण विश्वास ठेवून आहे. शिवाय, या पृथ्वीवरचे जीवन हेच काय ते अंतिम सत्य - त्याला आगा पिछा असू शकेल, याबद्दल अनभिज्ञ व अनुत्सुक अशी दिसेल. 'विश्वभान' व 'आत्मभान' हे प्रकरण काय आहे हे फक्त भारतीय संस्कृतीतच पूर्णांशाने आपल्याला दिसेल. पाश्चात्य व भारतीय ह्या भूसंदर्भाचा दाखला, मी या दोन संस्कृतींना जाणीव पूर्वक देतो, तो मुख्यतः त्या संस्कृतीचा पृथ्वीवरील भूमी, प्राणी, वनस्पती व प्रकृती यांच्या त्या संस्कृतीच्या मूळ बीजाच्या उगम ना संवर्धनाने असलेल्या नात्याच्या संदर्भाने देतो आहे. 'दैनिक शास्त्र' ह्या श्री १०८ सांबारी महाराज, ह्या एका 'हिमालयन मास्टर्स' च्या 'साक्षात्कारी' किंवा 'समाधिजन्य' ज्ञानाच्या संदर्भात देतो आहे.

**भारतीय वैशिष्ट्य आध्यात्मिक-वैश्विक -**

'वैदिक संस्कृती' ही जर विश्वाच्या रचनेचा व आराखड्याचा असा एक चैतन्याचा मार्ग असेल व जर त्या संस्कृतीचे जतन व वृद्धी, जर पृथ्वीवरच्या एखाद्या सुयोग्य व पवित्र भूभागावर होणार असेल, तर साध्या तर्कसंगतीने, भारत हीच ती भूमि असावी, असे म्हणावयाला अनंत पुरावे आहेत. ह्यात गैर काही नाही. केशर व कस्तुरी काश्मीरलाच का होते व टिकते ? त्यांचे बीज कसे झाले!!

आधुनिक भौतिकवादी विज्ञान ह्याची कारणमीमांसा देऊ शकत नाही.

पण म्हणूनच ह्या संस्कृतीचा भार- जीवनाचा एक 'ऋणभार' म्हणून, विशिष्ट वर्ण व प्रवृत्ती घेऊन ह्या भारतात जीव जन्माला येतात असे दिसते. 'आध्यात्मिक ज्ञानाचा' हा ज्ञानमार्ग, विश्वभान व आत्मभानाचे हे जैविक चैतन्य अनेक अवतार घेऊन जन्माला आले आहे. राम, कृष्ण, गुरु नानक, कबीर, रामदास, ज्ञानेश्वर, रामकृष्ण परमहंस, चैतन्य महाप्रभु, विवेकानंद, रमण महर्षी आणि अनेक लहानमोठी 'स्पिरीच्यूअल' व्यक्तिमत्त्वे, ह्यांचे 'परसेंटेज ऑकरन्स्' (Percentage Occurence) ही इथेच जास्त का, याचे हे उत्तर आहे.

देश म्हणजे Nation (मॅझिनीने केलेली व्याख्या) बाजूला ठेवा. 'देश' शब्दाची दैशिकशास्त्रातील 'पारिभाषिक' (Jargon) व्याख्या ही 'दिशतीति देशः' अर्थात, जी भूमी आपल्या 'आश्रित जातीस' सूचित करते त्यालाच 'देश' म्हणतात.

**'देश व जाति' परिभाषिक संज्ञा -**

या व्याख्येनुसार 'ऋत व सत्य ज्ञानाचा' व आपल्या आत्मोद्धाराची धारणा घेऊन जन्माला येणाऱ्या जीवाना, एक 'जातिधर्म' जन्मतःच प्राप्त होतो. ही 'जातीची' भारतात पैदास, निर्मिती व उन्नती सतत होत रहाते असे दिसते. 'जाति' याची पण निराळी व्याख्या आहे. ही 'जाति' सहज, सावयव आधिजीविक 'सृष्टी' आहे. अर्थात मनुष्याच्या कृत्रिम उपायांनी ती बनत नाही या नष्ट

होत नाही. त्याची उत्पत्ती आणि विनाश 'भगवती प्रकृतीच्या' इच्छेप्रमाणेच होत असते. ज्यासाठी जीवधारी सृष्टि होते त्याचसाठी जातीचीही 'सृष्टी' होत असते...आणि अशा प्रकारच्या समान मानसिक प्रवृत्तीस समाज प्रकृति निमित्त होऊन जो जनसमुदाय झाला त्यालाच 'जाति' अशी संज्ञा (पारिभाषिक) दैशिकशास्त्रात दिली जाते.

इथे आता स्पष्ट सांगायलाच हवे की माणसांचे जन्म कुठे व का होतात याची आधुनिक विज्ञानात काहीही कारण मीमांसा व जिज्ञासा- खऱ्या अर्थाने नाही. पण, ही एक योजना आहे असा तर्क करावयाला जागा आहे. भगवद्गीतेमध्ये अशा तऱ्हेचे संकेत सापडतात. अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना भगवान कृष्ण त्याला खात्री देतात की त्याचा पुढील जन्म अशाच योग्य स्थळी व काळी होईल की त्याच्यावरच्या ज्ञान संस्काराचा पुढचा प्रवास सोयिस्करपणे चालू राहील.

कुठल्याही संस्कृतीच्या युगानुयुगे अस्तित्वासाठी अशी योजना आवश्यकच आहे. एव्हढेच नव्हे तर त्या संस्कृतीच्या वृद्धीमध्ये मानवी जीवनाचा मोठा हातभार आहे हे मान्य करतानाही त्या संस्कृतीच्या प्रेरणा ह्या कुठून प्राप्त होतात ह्याबद्दल फारसे चिंतन नाही. ह्या प्रेरणेत निसर्गाचा व वैश्विक निर्मिती करणाऱ्या शक्तीचा हात असतो असा तर भारतात जन्मलेल्या प्रत्येक माणसाचा सुप्त विश्वास आहे. मी 'सुप्त विश्वास' हा शब्दप्रयोग जाणीवपूर्वक केला आहे.

**सुप्त जाणिवा -**

माझ्या लेखातील कित्येक विधाने गूढ व अगम्य वाटण्याचा खूप संभव आहे व त्याची मला कल्पना आहे. त्याचे, मुख्य कारण म्हणजे आपण एका बंदिस्त पिंजऱ्यात जगत असतो. हा पिंजरा दृश्य व जड बनून आपल्याच बुद्धीच्या, तर्काच्या, इंद्रियांच्या बांधिलकीवर व क्षीण क्षमतेवर आधार व अंमल ठेऊन आहे. आपण एका 'पॅरॅडिमचे' कैदी आहोत.

आपल्याला जे ज्ञान हवें आहे ते दुष्प्राप्य व आपल्या क्षमतेबाहरचे आहे. ह्या जड जगाचे ज्ञान होण्याची क्षमता आपल्याला प्रदान केलेली आहे, पण ह्या जगाच्या पलीकडची आपल्या जन्म मृत्यूच्या पलीकडची ज्ञानप्रगतीची नाही !!

**वैदिक संस्कृति -**

हे ज्ञान मिळवून देण्याचा चंग वेदांनी बांधला आहे हे ज्ञान 'अपौरुषेय' आहे. याचा अर्थ हे सर्वसाधारणपणे मानवी वैज्ञानिक क्षमतेच्या बाहेरचे आहे, आणि भ्रमात्मक किंवा क्षर किंवा नाशिवंत वस्तूंचे आहे. अक्षर व ऋत व सत्य ज्ञान हे अपौरुषेय व साक्षात्कारी पद्धतीचेच आहे. हे 'अव्यक्त' जगाचे ज्ञान आहे. या 'अव्यक्त' जगाच्या सामर्थ्यावर आपले नाशिवंत 'व्यक्त जग' उभे आहे, चालत आहे.

पण, मग हे ज्ञान आपल्या मर्त्यबुद्धीच्या व इंद्रियांच्या मार्फत आपल्याला करून घ्यावयाचे आहे. हा प्रयत्न आपला आहे. त्यामुळे त्या ज्ञानाचे 'वाहक' त्या क्षमतेचे असावयाला हवेत.

**संस्कृतीची साधने -**

ज्ञानाच्या संवाहीगुणासाठी जे वाहन, जी भाषा, जे तंत्र, यंत्र निर्माण करावयाचे त्यांची रचना व बांधणी दोन्ही बाजूंचा संबंध जाणणारी व समजावणारी असावयाला हवी. त्यामुळे ह्या ज्ञानसाधनांचा एक चेहरा - एक बाजू भौतिकाकडे आधारलेला व दुसरा 'अव्यक्त' जगाकडे डोकावणारा असावयाला हवाच !! A two way instrument.

जर संस्कृत ही भाषा देववाणीपदाला प्राप्त असेल, तर तिच्यात ही क्षमता असावयाला हवी. तेव्हा संस्कृत-

संस्कार-संस्कृती ही चेन-साखळी ह्या गुणवत्तेला कशी उतरते ते पाहू या.

ही सृष्टी कशी बनली हे 'विज्ञान' आहे. ही सृष्टी कां बनली तिच्या पृष्ठभूमीवर 'शाश्वत सत्य' काय आहे हा विषय 'दर्शन' (Vedic Philosophy) चा आहे. ह्या सृष्टीत कोणत्या 'शाश्वत शक्ती' काम करत आहेत. त्यांच्यामध्ये परस्पर संबंध काय आहेत - मूळ विश्वनिर्मितीच्या शक्तीच्या मार्फत जगतउत्पत्ती, स्थिती व लय अशी त्रिविध योजना कशी व कां चालते हा विषय वेदाचा आहे.

**संस्कृत व अपौरुषेय ज्ञान -**

हे सांगण्याकरिता मानवाला ह्या पृथ्वीवर जड जगाचें जे ज्ञान झाले, जी क्षर तत्वे दिसली, जी भाषा व तिचे सामर्थ्य व अर्थ प्राप्त झाले वा अनुभवांच्या जोरावरच वेदांचे ज्ञान समजण्यासाठी, संस्कृत भाषेला 'छायावादी' व 'प्रतिकवादी' भाषांच्या, कृतींचा आश्रय मानवी मनाच्या व बुद्धीच्या क्षमतेच्या संदर्भात घ्यावा लागला ते कसे ते आता उदाहरणांतून पाहू या -

ऋग्वेदात एक प्रश्न केला आहे

**पृच्छामि त्वा परमन्तः पृथिव्याः**

(१/११६/३४) क्र. ५

त्याचे उत्तर (वर्तुळ, बिंदू, रेषा, गोल वा युक्लिडियन भूमिती ज्ञानाच्या संदर्भात)

इयं वेदिः परो अन्तः पृथिव्या : । (क्र. ६)

प्रश्न आहे : पृथ्वीचा टोकबिंदू कोणता ?

उत्तर आहे - ही वेदीच पृथ्वीचा अंतिम बिंदु आहे.

वर्तुळाला आरंभ, बिंदु नाही, तसाच तो पृथ्वीला नाही आणि कुठल्याही बिंदूवरून वर्तुळाच्या रेषेवरून प्रगती करतांना त्याच बिंदुपाशी आपण येतो तोच पुन्हा अंतिम बिंदू.

पृथ्वीचे गोल स्वरूप सांगण्याची ही युक्ती होय. ही 'छायावादी भाषा' घेऊया. जरा कठीण उदाहरण आहे व ते 'यज्ञकुंड क्रिया' व कुंडलिनी जागृती, मस्तिष्क-सहस्त्राकारचक्रातील मानसिक यज्ञक्रिया व सोमरसाची उत्पत्ती व रक्षण आणि कॉशसनेसची गुणात्मक वृद्धी ह्या प्रात्यक्षित 'आगम' ज्ञानावर व क्रियेवर भाष्य करणारी आहे.

यज्ञाच्या क्रियेमध्ये, अग्नि, समिधा, यज्ञीय धूप, पुरोडाश, सोमरस, स्थालीपाक, यज्ञपात्र, वगैरे साधने व सिद्धी आहेत. त्यांचे भौतिक वर्णन कुठेही सांपडेल व पाहू शकाल.

पण हा सर्व यज्ञ एक प्रतीक व त्याचा संदर्भ मानवी शरीरातील कुंडलिनी शक्ति जागृत होऊन तिचे सहस्त्रारचक्रात (मतिष्कांत) जे गुणात्मक बदल घडतात व सोमरसाची प्राप्ति वर्षा शरीर, मन व कॉशसनेसवर होते त्याच्याशी संदर्भ आहे.

'पुरुषविधो वै यज्ञः' ह्या ऋचीचा अर्थ शरीरांत होणाऱ्या 'अध्यात्मक्रियेशी' आहे.

ह्या गुह्यार्थाचे संदर्भ मोठ्या हुषारीने निरनिराळ्या संहितेमध्ये पसरलेले आढळतील.

**मस्तिष्को वै पुरोडाशः । तै. ब्राह्मण ३/२/८/७॥**

**शिरो देवकोशः । अथर्व १०/२/२७॥**

मस्तिष्काला 'देवकोश' म्हटले आहे. वीर्य किंवा रेत हेंच यज्ञीय 'तूप'- आज्य आहे.

**रेतो वा आज्यम । शत. १/६/२/७॥**

**प्राणो रेतः । ऐ. ब्रा. २/३८ ॥**

ह्या यज्ञात जो अग्नि दिसतो तो भौतिक स्वरूपात सर्वसाधारण माणसाला दिसतो. पण हा ऋग्वेदीयन 'अग्नि'

आहे. काय आहे त्याचे खरे स्वरूप !

ऋग्वेदात 'अग्नि' हा 'प्रकाश' द्योतक आहे. हा त्या 'ज्ञानाचा' प्रकाश आहे की जे भौतिक ज्ञान नसून मानवी जीवनाला अगम्य असे 'अव्यक्त' जगातले ऋत, सत्य ज्ञान आहे. जे आपल्या ह्या जीवनात 'सुप्त' जाणीवेत 'Spiritual Aspiration' म्हणजे आध्यात्मिक जिज्ञासेच्या स्वरुपात सूप्त-निद्रिस्त अशा स्थितीत आहे.

'अग्नि' ह्या वैश्विक शक्तिमार्फतच आपल्या Consciousness मध्ये जाणीवेच्या - realisation अनुभूतीच्या स्वरूपांत हे ज्ञान 'प्रकाशित' होणार आहे. हे अग्निचे कार्य व सामर्थ्य आहे.

**तमसो मा ज्योतिर्गमय ।**

हे 'तम' म्हणजे अज्ञान-अंधकार व ज्योति म्हणजे 'ह्या' ज्ञानाचा प्रकाश.

त्यामुळे 'अग्नि' जरी ह्या जगात भौतिक पदार्थ, रसायने व वस्तू परिवर्तन करणारा 'एजंट' असला तरी तो वैदिक ज्ञानाच्या संदर्भात मानवी मनाची, कॉशसनेसची आध्यात्मिक वृत्ती व ज्ञानामध्ये परिवर्तन करणारा एक वैश्विक, चिरंतन शक्तिचा द्योतक आहे.

**कर्मकांड - प्रतिके आगमशास्त्र -**

यज्ञाच्या कर्मकांडातून ह्या अग्निच्या खऱ्या आध्यात्मिक शक्तिचा परिचय करून देण्याचा ह्या प्रतिकातून खऱ्या ज्ञानाकडे संक्रमण करण्याचा प्रयत्न आहे. ह्या क्रिया दृश्य स्वरुपाच्या नाहीत तसेच त्या क्रियेचे वर्णन साध्या मानवी भाषेतून करणे अशक्य (ज्ञानेश्वरांची क्षमा मागून - 'अरुपाचे रुप दाखवीन' ही त्यांची प्रतिज्ञा).

त्यामुळे संस्कृत भाषेच्या दैवीगुणांच्या मदतीने व यज्ञाच्या प्रतिकामार्फत हे अगम्य ज्ञान मानवाला बोधस्वरुपात देण्याचा हा वैदिक ऋषींचा 'अफाट' यत्न होय.

मानवाच्या 'मस्तिष्क-डोक्यांत' चार भागात जो रेत रूप 'सोम' भरलेला आहे, त्याच्या स्त्रोतांचे, संचयाचे पावित्रीकरण ती क्रिया पुढे ऋग्वेदात 'पवमानसूक्तांत' विदित केली आहे. पण, त्याचा अर्थ प्राप्त होण्यासाठी व ती क्रिया प्रत्यक्षात घडवून आणण्यासाठी ह्या व्यक्त व अव्यक्त जगाच्या संबधांची पूर्ण जाणीव होणे अत्यंत जरूरीचे आहे. त्यासाठी ह्या अदृश्य, अगम्य व अव्यक्त जगांतील 'अग्नि' चा उपयोग जरुरी आहे. त्याचे पूर्ण ज्ञान हे कल्पनाशक्तीच्या जोरावरच होणे शक्य आहे. ह्या नंतर ह्या ज्ञानाचा संस्कार व 'संस्कृती (भारतीय) ह्या प्रातांत' कसा होतो ते पुढच्या लेखात पाहू या.

(क्रमशः)

**यशवंत साने**
(स्पिरीच्युअल सायन्स सेंटर)
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी : २५३६ ८४५०
ई-मेल : yrsane@eth.net

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# आधुनिक मराठी कवितेचे जनक
## कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत (१८६६-१९०५)

केशवसुत यांचे हे स्मृतिशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने केशव सुतांच्या कवितेचा हा एक विचार. *आहे.* - *संपादक*

कवीश्रेष्ठ केशवसुतांच्या स्मृती शताब्दी वर्षात मला त्यांच्या जन्मगावी मालगुंडला जाण्याचा योग आला. हे मी माझं भाग्य समजते. त्याचं हे स्मारक को.म.सा.प. ने अत्यंत परिश्रमपूर्वक उभे केले आहे. जणू काही देवाचं पवित्र मंदिर. इतकं पावित्र्य, स्वच्छता आणि सौंदर्य त्यास्थळी जाणवलं.

शेणानं सारवल्या भिंती, खालची जमिन, अंगणं (मागचं पुढचं) असं कोकणातलं कौलारु घर. बाहेरची पडवी, माजघर, देवघर, न्हाणीघर, स्वयंपाकघर, धान्याचं साठवणीचं कोठार, शेजघर, मागची पडवी, न्हाणीघर असं प्रशस्त, पवित्र. कविवर्यांचं घर आरशासारख लख्ख. एका काचेच्या मोठ्या पेटीत त्याकाळच्या बऱ्याच वस्तू संग्रहीत केलेल्या आहेत. फणी करंडा, कुंकवाची पेटी, आडकित्ते, पानाचा डबा, दिवे, समया, भांडीकुंडी, डाव पळ्या, चमचे, झारे, कढया, तिवई, कळशा, देवाची उपकरणी, देवाच्या मूर्ती वगैरे बऱ्याच गोष्टी तेथे व्यवस्थित मांडल्या आहेत. घराच्या बाहेर पायच निघत नव्हता. एवढ्या मोठ्या कविश्रेष्ठांच घर तेही त्याच्या स्मृतिशताब्दी वर्षी पहायला मिळालं म्हणून धन्य धन्य वाटतं होतं.

घराच्या मागच्या दाराने बाहेर पडल्यावर तिथे केशवसुतांच्या सुप्रसिद्ध कविता 'नवा शिपाई', 'तुतारी', 'गोफण', 'स्फूर्ती', 'सतारीचे बोल', 'झपूर्झा', 'घड्याळ', 'कोणीकडून कोणाकडे', 'आम्ही कोण' अशा कितीतरी कविता सिमेंटच्या खांबावर काचेच्या पेट्यां मधून सुवाच्य सुंदर अक्षरात लिहून लावलेल्या होत्या. शाळा कॉलेजात पूर्वी त्यांच्या कविता अभ्यासलेल्या होत्या. (सध्या काही वर्ष दहावीच्या मुलींच्या शाळाबाह्य प्रकल्पात मराठी काव्य मी शिकवीत आहे. त्यामुळे केशवसुतांच्या काव्याशी सतत संबंध टिकून आहे.) त्यामुळे पूर्वस्मृतींना उजळा मिळाला. या ठिकाणी निसर्गसान्निध्यात काव्य मैफिलीसाठी मोकळे भव्य व्यासपीठ आहे. अगदी चारीबाजूनी उघडे असे. वाचनालय ही बघण्यासारखे आहे. सुरेख, व्यवस्थित नावाच्या पाटीसहित काचेच्या भव्य कपाटातून पुस्तके ठेवलेली आहेत. दाराशी केशवसुतांचा पुतळा आहे. भिंतीवर सुप्रसिद्ध लेखक, कवींची छायाचित्रे आहेत त्यांच्या माहितीसह सारेच सुंदर नि सुरेख.

स्मारक प्रवेशासाठी अल्पसे मूल्य ठेवलेले आहे. तसेच भेट देऊन गेलेल्या प्रत्येकाला अभिप्रायार्थ प्रवेशद्वाराशी वही पण ठेवलेली आहे. अभिप्राय लिहून पाय निघत नव्हता तरी जाणे भाग होते. केशवसुतांच्या स्मृतीला मनोनम पुन्हा वंदन करुन गाडीत बसले ती त्यांच्या काव्याने भारुन, मंत्र मुग्ध होऊन त्यांच्या विचारातच.

१८८५ ते १९०५ या कालखंडात काव्यातील आशय व अभिव्यक्ती यात आमुलाग्र बदल घडवल्यामुळे त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हटले जाते. सामाजिक रुढी विरोधी बंडखोरी, निसर्गाबद्दलचा नाविन्यपूर्ण दृष्टिकोन, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा काव्यांतून पुरस्कार, आत्मनिष्ठा, संवेदनशीलता, समाजाभिमुखता ही लेखन वैशिष्ट्ये. प्रा. लागू म्हणतात 'पूर्वीची वस्तुनिष्ठ कविता गद्यसदृश होती, ती त्यांनी

आत्मनिष्ठ केली. त्यामुळे अनुभूतीचा जिव्हाळा वाढला. काव्याचे रूपच या काव्यविषयक दृष्टीकोनामुळे बदलले. मराठी कवितेवर त्यांनी इंग्रजी कवितेचे कलम केले.

त्यांचे काव्य स्वतंत्र होते की इंग्रजीचे (काव्याचे) अनुकरण होते. त्यांचे काव्य अक्षर आहे की तात्कालिक महत्त्वाचे आहे, अशी अनेक मतमतांतरे होती. 'कवी', 'आम्ही कोण', 'प्रतिभा' या कवितातून त्यांनी कवि महात्म्य वर्णन केले आहे. 'तुतारी', 'स्फूर्ती', 'नवा शिपाई', 'गोफण', 'मूर्तिभंजन', 'निशाण', 'उत्तेजनाचे शब्द', 'अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न' या रुढीविरोधी प्रतिपादनात्मक कविता या पाश्चात्य कवितांवर आधारित होत्या. आपले काव्य इंग्रजी वळणाचे व्हावे ही कल्पना इंग्रजी कवितेच्या अभ्यासाने केशवसुतांच्या मनात अधिकच दृढ झाली होती. 'गोल्डन ट्रेझरी' पलिकडे केशवसुतांचे वाचन नव्हते' असे माडखोलकरांनी त्यांच्या काव्याबद्दल मत व्यक्त केले होते. तरीपण शब्दाकरिता शब्द घातले असे त्यांच्या कवितेत झाले नाही. 'शब्दांनो मागुते या ' असे ते म्हणत. त्यांचे शब्द अर्थाला अपुरे पडत परंतु अर्थशून्य शब्दांची आतषबाजी त्यांनी केली नाही. १८८५ ते १९०५ मराठी कवितेला निराळे वळण देण्याचे कारकत्व केशवसुतांना द्यावयास हवे. अक्षरवृत्ते अधिक बंधनकारक असतात म्हणून मात्रावृत्ताकडे मराठी कविता नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

त्याकाळी वैयक्तिक अनुभव व विचार हे काव्याचा विषय होऊ शकतात ही गोष्टच मुळी नवीन होती. असा आत्मविष्कार केशवसुतांच्या कवितेतून प्रथमच प्रामुख्याने झाला. पूर्वीच्या काव्यात असे वैयक्तिक विचार सहसा येत नसत. विषय कोणताही असला प्रेम, निसर्ग, काव्य, सामाजिक आचार किंवा जीवदविषयक तात्त्विक विचारही असला तरी त्याकडे आपल्या दृष्टिकोनातून पाहून स्वतःची मते अनुभव व भावना कवी व्यक्त करू लागला की त्याला काही वेगळेपण चढते व त्यातील आशय अधिकच प्रत्ययकारी होऊ लागतो हे केशवसुतांच्या कवितेने दाखवून दिले व त्यामुळे त्यांच्या मागून येणाऱ्या नवीन कवींना या नवीन काव्य रचनेचा आश्रय घ्यावासा वाटला. आणि केशवसुतांच्या मृत्यूनंतर पंधरा वर्षातच नवीन कविता विरोधाला व जुमानता दृढमूल झाली. त्याचे श्रेय केशवसुतांकडेच निर्विवाद जाते.

मानव व निसर्गातला विरोधच त्यांना अधिक जाणवला, हे केशवसुतांचे 'हरपले श्रेय' आहे. गडकऱ्यांप्रमाणे कल्पना विलास व भाषाविलास हा केशवसुतांच्या कवितेत दिसून येत नाही. बालकवींच्या कवितेतील लालित्य आणि सृष्टी सौंदर्याविषयी तरल भावानुभूती याही गोष्टी केशवसुतांच्या कवितेत आढळत नाहीत. विनायक, टिळकांची प्रसादपूर्णताही त्यांच्या कवितेत नाही. अशी सर्वप्रकारची प्रतिकूलता असूनही त्यांना हे स्थान मिळण्याचे कारण त्यांच्या काव्यात नवे प्रभावी विचार, त्यांचे उत्कट प्रकटीकरण आणि त्यामुळे भाषेला प्राप्त झालेला ओज यामध्ये आहे. त्यांच्या अनेक कविता मराठी काव्यास भूषण ठरल्या. आपल्या माध्यमावरील विश्वासाच्या जोरावर आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर त्यांनी मराठी कवितेस आपल्या मनाशी योजल्याप्रमाणे निराळे वळण लावले.

केशवसुतांचे गुरु टिळक आणि आगरकर हे गद्य लेखकच होते. त्यांनीही गुरुंप्रमाणे गद्य लेखकच व्हायला हवे होते. (तसे त्यांनी एक गद्य नाटक स्पर्धेसाठी लिहिलेले होते पण त्याला बक्षिस मिळाले नाही म्हणून गद्यावर रागावून ते पद्य लेखनाकडे वळले असा काहींनी शोध लावला होता. वर्गात एकदा दुसऱ्या कोणी गुरुजींनी त्यांना 'दुर्मुखलेला' म्हटले म्हणून केशवसुतांनी त्यांना उत्तर म्हणून 'दुर्मुखलेला' ही कविता लिहून दिली.

**माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया चालावयाचा पुढे**
**आहे सुंदर तो सदा सरसवाङनिष्यन्द चोहीकडे !**
**तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी !**
**कोणी ही पुसणार नाही कवि तो होता कसा आननीं?**

केवढा जबर आत्मविश्वास ! गुरुजींनी केलेल्या टिकेला 'नवी काव्ये' लिहिण्याचे आव्हान त्यांनी दिले. त्यावरून नवीन कवितेची दोन लक्षणे दृग्गोचर होतात. १) स्फुट रचनेचे २) आत्मलेखनाचे. स्फूटत्व हे काही काळ अगोदर मराठी कवितेत येऊ लागले होते. पण आत्मलेखन मात्र नव्यानेच आले.

**'अशी असावी कविता, फिरुन ।**
**तशी नसावी कविता, म्हणून ।**
**सांगावया कोण तुम्ही कविला ।**
**आहात मोठे पुसतो तुम्हाला ? '**

असा सवालही केशवसुतांनी याच काळात केला. काव्यविषयक नव्या विचारांना प्रारंभ याचवेळी कवीच्या मनात झाला असल्याची ही साक्ष आहे. या कवितेतील अहंकार म्हणजे झपाटा आहे असे 'आधुनिक मराठी कवितांत' प्रा. भ. श्री. पंडितांनी म्हटले आहे.

नवी काव्ये लिहिण्याचे आव्हान हे क्षणिक प्रतिक्रियात्मक रागातून आलेले नसून स्वाभाविकपणे व विचारपूर्वक आलेले आहे असेच म्हणावे लागेल. 'दुर्मुखलेल्या' या कवितेच्या चतुश्लोकी रचनेवरून इंग्रजी 'सॉनेट' रचनेची कविमनावर असलेली अस्पष्ट छायाही प्रतीत होण्यासारखी आहे. शेली, वर्डस्वर्थ यांची स्फुटरचनाच त्यांना आकृष्ट करती झाली. केशवसुतांनी काव्याचे जे नवीनत्व पत्करले होते ते जाणीव पूर्वक होते, अजाणता नव्हते. आपल्या 'फुकट दवडलेला तास' या कवितेमध्येही 'बा, काहीतरी गा नवीन' अशी आज्ञा कवितेने आपल्यास केल्याचा उल्लेख ते करतात.

आत्मलेखनात्मक कविता इंग्रजीतच लिहिली जाते असे नाही तर मराठीत ही लिहिता येते हे केशवसुतांनी दाखवून दिले. आत्मलेखनात निसर्गविषयक, प्रेमविषयक, सामाजिक, जीवनविषयक खोल अनुभूतींना अभिव्यक्त करता येते. थोडक्यात आपले अंतर्गत भावनाविश्वच शब्दांनी साकार करता येते हे केशवसुतांनीच दाखवले. कवींची बहिर्मुख दृष्टी अंतर्मुख करण्यामुळे मराठी कवितेत क्रान्ती झाली. ही क्रान्ती त्यांच्यामुळे झाली की इतर कारणांनी झाली ? ते कोणत्या अर्थाने क्रान्तिकारक होते. सामाजिक की काव्यविषयक अर्थाने, त्यांचे काव्य स्वतंत्र होते की इंग्रजी कवितेचे अनुकरण होते, ते चमत्कृतीप्रधान होते की रसपरिपूर्ण होते ? त्यांना रोमॅंटिक कवी म्हणता येईल का ? ते आशावादी होते की निराशावादी होते ?

अर्वाचीन मराठी कवीत केशवसुतांइतका वादग्रस्त कवी कोणी झाला नाही. तिच्या पहिल्या मूल्यामापनाच्या बाबतच अनेक चढउतार किंवा आंदोलने होऊन गेली. बा. सी. मर्ढेकर नवकवितेचे जनक अध्वर्यु. त्यापासून केशवसुतांचे युग संपले आणि नव काव्याला आरंभ झाला असेही कोणी कोणी म्हटले आहे. पण ते सकृतदर्शनी वाटले तरी ते वस्तुतः खरे नाही. काव्य म्हणजे कवीचे आत्मलेखन किंवा त्याची जीवनाविषयक शब्दरूप प्रतिक्रिया हे केशवसुतांच्या कवितेचे रूपच थोड्याफार फरकाने आजच्याही कवितेत दृष्टीस पडते. कवी अंतर्मुख होऊन आपल्या भावविश्वाचे चित्र शब्दांनी काढीत आहेत, तोपर्यंत काव्यविषयक परंपराच ते चालवित आहेत फक्त रचनेवरील बंधने दूर करून ती आत्मविष्कारास सुकर करण्याचे त्यांचे धोरण आजच्या मुक्तछंदात पर्यवसित झाले आहे इतकेच असे प्रा. रा. श्री. जोग यांनी १९६४ साली 'हरपले श्रेय' या त्यांनी संपादित केलेल्या केशवसुतांच्या निवडक कवितांचा परामर्श घेतांना म्हटले होते.

काव्यनिर्मिती प्रक्रियेविषयी केशवसुतांचे विचार जाणून घेण्यासारखे आहेत. जीवनातील गर्दीपासून दूर.

मनाच्या एका विशिष्ट ध्यानानुकुल अवस्थेत भावना आणि शब्द उत्कट झाली असता काव्यनिष्पत्ती होते अर्थात तिला स्फूर्तीच्या साहाय्याची अपेक्षा असते. त्यावेळी व्यावहारिक, सुखदुःखादी व्दंव्दाच्या पलिकडे कवी जातो. अशा अवस्थेचे वर्णन शब्दांनी करता येत नसल्याचे तिला 'झपूर्झा' (जा पोरी जा, जा पोरी जा हा झिम्मा खेळतांना वेगात शब्द बोलले की 'झर्पुझा' असा उच्चार ऐकू येतो.) म्हणावे असे ते सुचवतात.

**'हृदय आत्म्याला जधी खेळविते।**
**हृदय आत्म्याला जधी आळविते ।'**

अशावेळी काव्य आपोआप रूप घेते. तेथे तंत्रादी गोष्टी किंवा कला चर्चेची जरुरी नसते.

'शब्द' आणि 'भावना' हे दोन घटक जुळले की ह्या दोन घटकांचा संगम होतो, हे काव्य होय. त्यातून सुरस कल्पना व विचार निर्माण होतात असे ते आपल्या 'चिन्हीकरण' या कवितेत म्हणतात. विचाराला त्यांच्या कवितेत प्राधान्य होते म्हणूनच भावनेच्या उत्कटत्वापेक्षा विचारांची भारवत्ताच त्यांच्या कवितेत वाचकास प्रतीत होते. 'कवितेचे प्रयोजन' या कवितेतील त्यांच्या पुढील ओळी पहा -

**''काल क्रीडित हे बघून रडला हे व्यस्त काही नसे,**
**प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवींचा असे.''**

किंवा

**द्या उत्तजन हो कवीस, न करा गाणे तयाचे मुके;**
**गाण्याने श्रम वाटतात हलके हेही नसे थोडके;**

या ओळी वाक्प्रचारासारख्या सर्वांच्या तोंडी झाल्या आहेत.

'काव्य कोणाचे? ' मध्ये ते म्हणतात -

**'शारदेने जो मंत्र दिला कानी,**
**तसे लिहिले मी काव्य तिचे मानी '**

काव्याच्या प्रयोजनाविषयी त्यांनी दोन भिन्न विचार प्रगट केलेले दिसतात. एक विचार वैचारिक समाधानाचा व दुसरा सामूहिक उपयोगित्वाचा. 'करूनिया काव्य जनात आणणे' हा त्यांचा मुख्य हेतू नसून 'करूनि ते दंग मनात गुंगणे' हा त्यांचा सुंदर हेतू असल्याचे ते 'कविता आणि कवि' या कवितेत सांगतात.

केशवसुतांनी पाश्चात्य वळण स्विकारल्यामुळे त्यांची कविता अनुकरणात्मक व अनुवादात्मक झाली असे त्यांच्या कवितांबाबत म्हटले जात असले तरी काही कविता स्वतंत्र म्हणण्याइतकी पृथगात्म उतरली आहे. तुतारी, नवा शिपाई, गोफण, स्फूर्ती, अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न रुढीविरोधी कविता तशा नाहीत. त्यांनी इंग्रजी पद्धती स्वीकारली होती. पण तिचे अंतरंगही इंग्रजी आहे असे म्हणता येणार नाही. तथापि त्यांनी इंग्रजी कवितेची गुलामगिरी पत्करली होती असे नाही. केशवसुतांची कविता म्हटल्यावर क्लिष्ट कविता डोळ्यापुढे येत नाही. भावनाप्रधान कविताच येते. भावनांपेक्षा विचारच केशवसुतांना अभिप्रेत होता. शेली, कीटस्, वर्डस्वर्थच्या काव्यांचा परिणाम त्यांच्या काव्यावर मोठ्या प्रमाणात होतो.

त्यांची कविता सुंदर असण्यापेक्षा खडबडीत, ओबडधोबड अधिक होती. रसापेक्षा विचारांना त्यास प्राधान्य असे. काव्य मूल्यांच्या दृष्टीने गौण पण नवीन काव्य लिहिण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे ती अर्वाचीन मराठी कवितेचे आरंभस्थान होऊन बसली.

'कवि आणि काव्य' या विषयीच्या बऱ्याच कविता त्यांनी लिहिल्या. केशवसुतांनी १५-२० कविता याच विषयावर लिहिल्या. काव्याचे प्रयोजन, काव्यनिर्मितीची प्रक्रिया, काव्याचे विषय, कवितेचे घटक, कवी आणि कविता, प्रतिभा इ. त्यावेळी रुढ कल्पनांविरुद्ध

बंड करुन विचार क्षेत्रात तरी क्रान्ती करण्याचे कार्य काव्याला करता येईल. अशी त्यांची भावना होती.

प्रतिभेच्या कार्य शक्तीला ते 'स्फूर्ती' किंवा 'झपुर्झा' दिव्य ठिणगी अशा शब्दांनी सूचित करील. त्यांची 'रुष्ट सुंदरीस' ही कविता प्रतिभेला उद्देशूनच आहे.

त्यांनी चाळीस एक प्रेम कविता लिहिल्या पण त्यांची कविता प्रणयप्रधान नव्हती. त्यांच्या प्रेमकवितेत स्वानुभूतीचे प्रकटीकरण नव्हते. त्यांचा सच्चा चेला गडकऱ्यांना 'प्रेमाचे शाहीर' म्हणत. जी प्रेमाची उत्कटता त्यांच्या काव्यात होती ती केशवसुतांच्या काव्यात नव्हती. शेक्सपिअरचे इंग्रजी 'सॉनेट' प्रेमविषयकच असल्याने ते इंग्रजी 'सॉनेट' आणण्याचा प्रयत्नातील एक भाग म्हणजे त्यांच्या प्रेमकविता आहेत. त्यातल्या तीन-चार कविता तर काव्य देवतेस उद्देशून आहेत. पूर्वीच्या काळात स्वतःच्या प्रेमविषयक भावना सरळपणे लिहिण्यास संकोच वाटे. इंग्रजीत ते होते म्हणून त्यांनी इंग्रजीवरुन मराठीत काव्य कल्पना केल्या. त्या कल्पनाच होत्या त्यात अनुभूतीचा अभाव होता.

कवीचे आणि ताऱ्यांचे निकटचे नाते असते. त्या कवीच्या दिव्यत्वापुढे इतर जग भिकारी दिसते येथवर कवीच्या महात्म्याचे गायन ते करतात. त्यांच्या 'आम्ही कोण?' या कवितेत त्याचा प्रत्यय वाचकांना विशेषकरुन येतो.

**आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे;**
**आम्हाला वगळा-विकेल कवडीमोलावरी हे जिणे !**

स्वातंत्र्य, समता, बंधुता या पश्चिमेकडून आलेल्या तत्त्वत्रयीवर त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान आधारलेले होते. त्यांच्या सामाजिक कवितांचे - स्वरुप उपदेशाचे व प्रचारकी थाटाचे होते. त्यामध्ये कलात्मकता कमी असली तरी जिव्हाळा असल्याने त्यात भावोत्कटता आली आहे. इतर कवितात नैराश्याचा सूर हा कवी समाजविषयक कवितांत इतक्या आवेशाने व विश्वासाने लिहिताना पाहून आश्चर्य व कौतुक वाटते. केशवसुतांचा संप्रदाय म्हणजे सामाजिक क्रान्तीचा संप्रदाय अशी समजुत होण्याइतके सामर्थ्य या कवितेत खास आहे. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न, मजुरावर उपासमारीची पाळी, एका भारतीयाचे उद्‌गार, गोफण केली छान, नवा शिपाई, मूर्तिभंजन, निशाणाची प्रशंस्त, स्फूर्ती, तुतारी वगैरे.

एक तुतारी द्या मज आणूनी;
फुंकीन जी मी स्वप्राणाने,
भेदुनि टाकीन सगळी गगने
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने
अशी तुतारी द्या मज लागुनी;

जुने जाऊ द्या मरणा लागुनी;
जाळूनी किंवा पुरुन टाका,
प्राप्त काळ हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा

- तुतारी

काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या !
प्राशन करिता रंग जगाचे क्षणोक्षणी ते बदलू द्या !

- स्फूर्ती

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,
टेकुनि ती जनताशिर्षावरि जग उलथुनिया देऊ कसे !

- स्फूर्ती

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे !
ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा,
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा !
जिकडे जावे तिकडे भावंडे आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत ;

- नवा शिपाई

गाठ मारूनी वैराची
गोफण केली छान;
कठिण शब्द या धोंड्यांनी
करितो हाणाहाण !

-गोफण केली छान

त्यांच्या कवितेचे साधारणपणे असे वर्गीकरण करता येईल.

१) वैयक्तिक कविता - १) गोष्टी घराकडील २) नैऋत्येकडील वारा ३) आईकरिता शोक ४) दुर्मुखलेला.

२) कवी आणि काव्यविषयक कविता - १) कविता आणि दृष्टी २) फुकट दवडलेला तास ३) कवितेचे प्रयोजन ४) सृष्टी आणि कवि ५) शब्दांनो मागुते या ६) आम्ही कोण? एकंदर १६-१७ कविता येतात. आपल्याला 'नवी काव्ये गावयाची' ही जाणीव केशवसुतांना होती. 'दुर्मुखलेला' मधे तसे त्यांनी सूचित केले आहे. 'कविता आणि कवि' या कवितेत

'अशी असावी कविता, फिरुन
तशी नसावी कविता म्हणून
सांगातया कोण तुम्ही कवीला
आहात मोठे पुसतों तुम्हाला

किंवा

कवीस सोडा कवितेवरोवरी,
न जाच वाटेस तयाचिया तरी !

असे ही त्यांनी म्हणून ठेवले आहे. आधुनिक मराठी कविता ह्या पुस्तकात प्रा. भ.श्री. पंडित यांनी या कवितेतील अहंकार म्हणजे झपाटा आहे असे म्हटले आहे. त्यांना आत्मकवित्वाची जाणीव फार होती.

३) प्रेम कविता - चाळीस तरी भरतील. पण ह्या प्रेमविषयक कविता हा केशवसुतांच्या - पाश्चात्य कवितेच्या अनुकरणाचा भाग होता. इंग्रजी सॉनेट मराठीत आणण्याचा प्रयत्नातील भाग. त्यात स्वानुभूत प्रेम असे नव्हतेच. प्रीती, प्रयाण गीत, प्रणय कथन, फार दिवसांनी भेट, थकलेल्या भटकणाऱ्याचे गाणे वगैरे.

४) इंग्रजी 'सॉनेट' मराठी 'सुनित' १) मयुरासन आणि ताजमहाल २) चिरवियुक्ताचा उद्गार ३) वियुक्तांचा उद्गार ४) स्मरण आणि उत्कंठा त्यांच्या प्रेमाविषयक कवितातच त्यांच्या सुनितांचाही अंतर्भाव करता आला असता कारण त्यांच्या एकंदर नऊ सुनितांपैकी सात तर प्रेमविषयक आहेत, उरलेली दोन काव्यविषयक.

५) निसर्गविषयक - १) अढळ सौंदर्य २) एक खेडे ३) भृंग ४) दिवाळी ५) फुलांची पखरण ५) पर्जन्याप्रत वगैरे साध्याही विषयात मोठा आशय पाहण्याचा त्यांच्या वृत्तीमुळे मानवतेवर गोष्टींनाही स्वतंत्र कामाचा विषय होण्याचे भाग्य पाश्चात्य कवितेच्या परिशीलनामुळेच मिळाले.

६) सामाजिक व देश पारतंत्र्याविषयी सामाजिक क्रान्तीची भाषा असलेल्या कविता. यात तुतारी, स्फूर्ती, नवा शिपाई, गोफण, केळी छान, एका भारतीयाचे उद्गार, अंत्यजाचा मुलाचा पहिला प्रश्न वगैरे.

७) रूपांतरित, बोधपर आत्मभावनेचे उद्गार इ. रांगोळी घालताना पाहून, घुबड, सतारीचे बोल, दवाचे थेंब, घड्याळ, दिवस आणि रात्र, वातचक्र, स्फूट विचार वगैरे.

८) तात्त्विक कविता - कोठे जातोस? म्हातारी, झपुर्झा, कोणीकडून ? कोणीकडे?, हरपले श्रेय, आहे जीवित काय? स्वप्नामध्ये स्वप्न इ. जीव जगत व परमेश्वर यांचा परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचे आहेत हा तत्त्वज्ञानाचा मुख्य विषय.

- आशा भिडे
१३/९, विजय अपार्टमेंट, 'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे ४०० ६०२. • दूरध्वनी: २५४१ ०१४०

# 'माणुसकीचा' पुरस्कार करणारी 'संत शिकवण'

*संतांनी माणसाचा विचार 'माणूस' म्हणून केला. जातिभेद त्यांच्या दृष्टिने नव्हतेच. अकरावीतील एक विद्यार्थीनीने मांडलेला हा विचार.* *- संपादक*

संताचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही. त्याला संतत्वाच्या आणि दिव्यत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही. तोच खरा अस्पृश्य समजावा. ही विशाल आणि सर्वसमावेशक दृष्टी संतांच्या साहित्यातून प्रकट झाली आहे. **'भेदाभेद भ्रम अमंगल'** आणि **'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत'** हा उदात्त विचार तर्क शुद्ध आहे. लोकोध्दाराकरिता तळमळणाऱ्या आणि निर्धारपूर्वक झटणाऱ्या व्यक्तींना मध्ययुगीन काळात संत ही पदवी देण्यात आली. संत हे 'बोले तैसा चाले' असे असतात. संताची अभंगवाणी ही मराठीचे आणि महाराष्ट्राचे परमभूषण आहे. तिचा उगम निवृत्ती नाथात आणि परिणती निळोबारायत झाली. निवृत्तीनाथ म्हणजे ज्यांनी भागवतधर्म मंदिराचा पाया रचला आहे , ज्ञानदेवाचे गुरु आणि निळोबा म्हणजे मंदिरावर जे कळसरुप झाले त्या तुकोबांचे शिष्य. मराठी भाषेचा सार्थ अभिमान बाळगणारे संतशिरोमणि ज्ञानेश्वर, समाजप्रबोधन करणारे तुकाराम, अस्पृश्यतेच्या असह्य वेदना सहन करणारे चोखामेळा, मुक्ताई, जनाबाईसारख्या भोळ्या स्त्रियाही संतपरिवारात आहेत. वाळवंटात तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला गंगेचे तीर्थ पाजून गाढवात रामेश्वर पाहणारे संत एकनाथही या संतमालिकेत आहेत.

संतांनी मानवातील दानवी प्रवृत्ती बदलवून त्याला समतेचा, ममतेचा मार्ग दाखविला आहे. परमार्थच काय पण कोणताही अतिंद्रिय अनुभव केवळ नरजन्मातच काय तो शक्य आहे. हे ओळखून प्रत्येकाने आपल्या जन्माचे सार्थक करावे असे सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे. कारण पुढील जन्म येईल की नाही, आणि आला तरी कोणता येईल हे आपणास माहीत नाही. मेल्यावर मोक्ष मिळेल असे म्हणणारे केवळ मूर्ख आहेत. कारण दिवा गेल्यावर प्रकाश कोठून येणार ? तेव्हा हा देह आहे, तोपर्यंत साधना करुन आत्मज्ञान साधावे. तुकारामांनी ज्याचे हातपाय धड आहेत. देवाची कीर्ती गायला ज्यांचे 'मुख' व ऐकायाला 'कान' व त्याची मूर्ती पहायला 'डोळे' समर्थ आहेत अशाना भाग्यवान म्हटले आहे.

माणसाचे शारीरिक आणि मानसिक दुःख हे देवाकडे वळण्याचे एक प्रभावी प्रेरक कारण आहे. लोकांचे दुःख पाहून चिंतेने उर फाटतो. असे रामदासांचे उद्‌गार आहेत. **'संसारात दुःख पर्वताएवढे आणि सुख जवापाडे'** हे तुकारामाचे वचन प्रसिद्ध आहे. जग नश्वर आहे. हा विचार आजवर अनेकांनी सांगितला असला तरी परमार्थाकडे वळण्याचे एक प्रभावी कारण या दृष्टीने निवृत्तिनाथापासून सर्व संतांनी तो अतिशय परिणामकरितीने मांडला आहे. तुकारामांनी हा विचार अनेक प्रकारांनी सांगितला आहे. जन्ममृत्यूच्या रहाटगाडग्यातील गाडग्याची सुटका ते फुटेल तेव्हाच होणार. काळाची उडी पडली तेव्हा एका चक्रपाणी वाचून सोडविणारे दुसरे कोणी नाही. प्रत्यक्ष आई-बाप किंवा देशाचा राजा यांचासुद्धा काही उपयोग नाही. एकनाथांनी आपल्या स्वभावानुसार हा नश्वरतेचा विचार काव्यत्मरितीने सांगितला आहे. फूल झडून फळही गळून पडते. तेव्हा मृत्यू अटळ आहे. मृत्यूला भिऊन मागे वळणाऱ्यालाही मृत्यू चुकत नाही. म्हणून एकनाथ म्हणतात जेथे काळवेळाचा रिगावा नाही अशा सद्‌गुरुचरणी शरण जावे.

मनुष्य देवाकडे किंवा परमार्थाकडे का वळतो हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर सुखासाठी वळतो

असे देता येईल. मानवी जीवनातील दोष, अपूर्णता, विकार दूर व्हावेत यासाठी तो आत्मपरिक्षण करुन परमार्थाकडे वळतो. आपल्या जन्माचे सार्थक करा असे सर्व संतांनी सांगितले आहे. फूल विकसित झाले आहे, तोवर भ्रमराने त्यातील सौरभाचा आस्वाद घ्यावा. सुखप्राप्तीसाठी पांडुरंग मनी भजावा असे संत ज्ञानदेवानी सांगितले आहे.

'माणूस' हा माणूस म्हणूनच ओळखला जावा. त्याच्या कुळाला वर्णाला तसा काहीच अर्थ नसतो. पण माणसाच्या कपाळावर जाती-पातीच्या चिठ्ठया चिकटवल्या जातात. जातीने मनुष्य श्रेष्ठ ठरतो. हा विचार संतांनी पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. संतांचे विचार आणि आचार हे समतेचे द्योतक आहे. **'भेदाभेद, भ्रम, अमंगल'** आणि **'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत'**, असा संतांचा उदात्त विचार आहे. आपण जातीपातीचे, उच्च नीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे ते फेकून दिले पाहिजे व सर्व संतानी पुन्हा पुन्हा सांगितले संत कबीर म्हणतात -

**जाति न पुछो साधुकी ।**
**पुछ लिजिए ज्ञान ।**
**मोल करो तरवारका ।**
**पडा रहन दो म्यान ।**

खरं तर सर्वांचीच जात माणूसच असते. माणुसकीची उंची वाढावी हे संतांचे स्वप्न आहे. पण तसे घडत नाही. म्हणून संताना अनेक वेळा हुंदका फुटतो. चोखामेळ्याची दुःखार्त भावना त्याच्या अभंगातून व्यक्त झाली आहे. ते म्हणतात.

**हीन याती माझी देवा ।**
**कैसी घडे तुझी सेवा ।**
**मज दूर दूर हो म्हणती ।**
**तुझ भेटू कवण्यारिती ।**

विषमतेच्या दुःखाने पिचलेल्या मनात प्रेमाचा आणि एकतेचा विचार रुजविण्याचा प्रयत्न संतांनी केला. ज्ञानेश्वर, तुकाराम यासारख्या मराठी संतांचे कार्य हे केवळ सांप्रदायिक नसून ती एक व्यापक चळवळ आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा धार्मिक प्रबोधनाची होती. कनिष्ठ जातीत जन्मलेला सामान्य माणूस हाच त्यांच्या प्रबोधन चळवळीचा केंद्रबिंदू होता. या भागवत संप्रदायाचे प्रवेशद्वार सर्व जातीच्या आणि पंथाच्या स्त्रीपुरुषांना खुले होते. समर्थ रामदासांनी महाराष्ट्राला व्यवहार धर्म शिकविला. त्यांनी लोकांना बलसंवर्धनाची दीक्षा दिली. वेगळी दैवते, वेगळा संप्रदाय, मठस्थापना शिष्य संप्रदायाची विस्तार करण्याचे धोरण यामुळे रामदासांचे कर्तृत्व इतर संतापेक्षा निराळे वाटते. पण रामदास हे तुकारामाप्रमाणे एकनाथांचेच वारसदार होते. समाजव्यवस्थेची चौकट न बदलता जातिसंस्थेतील विषमता, संकुचित वृत्ती, मिथ्याभिमान, न्यूनगंड नाहीसे करण्याचे काम संताचे आहे.

संतांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. अस्पृश्यता निवारण्याचे काम केले. स्त्री शूद्र यांनाही समाजात मानाचे स्थान मिळावे यासाठी त्यांनी समाजाला योग्य उपदेश केला. संतांच्या वाणीप्रमाणे त्यांची जीवनचरित्रेही सात्विकतेने व शालीनतेने पुरेपूर भरलेली आहेत. एक धर्म व एकदैवत याप्रमाणे प्राचीन परंपरा याचीसुद्धा समाज एकरुप करण्यास मदत झाली. पूर्वीच्या रुक्ष,नीरस संस्कृतऐवजी बोलीभाषेचा अवलंब करुन चांगले विचार समाजात रुजविले. संतांनी मोक्षाची कल्पना बदलून टाकली. देवधर्म हाच देहधर्म नव्हे तर राष्ट्रधर्म हाच देवधर्म असे त्यांनी प्रतिपादन केले. आज समाजात माणुसकी हरवली आहे. संतांनी दाखविलेल्या मार्गापासून समाज दूर चालला आहे. भ्रष्टाचार, अनाचार, अत्याचार वाढत आहे. दुष्टप्रवृत्ती वाढत आहे. तेव्हा हे सर्व बदलून 'मानवताधर्म' जोपासण्यासाठी संतांनी दाखविलेल्या मार्गाशिवाय दुसरा पर्याय नाही.

**- मनीष गराटे**
कुर्ला, मुंबई

# मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यातील महानगरीय संवेदना

*कथनात्म साहित्यात येणारे स्थल, त्याचे स्वरूप व महत्त्वाचा संदर्भातील हा अभ्यासपूर्ण लेख. मुंबई महानगराचे मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यातील अस्तीत्व यावर विचार आला आहे.- संपादक*

**एक**

कथानात्मक साहित्यकृतीत एखादं काल्पनिक अथवा सत्यातंल स्थळ अवतरणं क्रमप्राप्तच आहे, नव्हे ती तर त्या साहित्यकृतीची अगदी अपरिहार्य अशी बाब आहे. घटना घडण्यासाठी आणि घटना विस्तारासाठी स्थळ हे असावंच लागतं. हे स्थल कधी गाव अथवा खेडं म्हणून येतं, तर कधी शहर, महानगर म्हणूनही येतं. परदेशातल्या अपरिचित अशा स्थळाचाही शिरकाव त्यात होतो. कथात्मक साहित्यकृतीतलं स्थळ कधीही एकटं, एकाकी येत नाही. निर्जीव स्थळाबरोबर निर्जीव वस्तूही येतात. वस्ती, वाड्या, रस्ते, इमारती, चाळी, घरं, बंगले, झोपड्या अचेतन गोष्टीही त्यांच्याबरोबरयेतात.


श्री. मधु मंगेश कर्णिक

या अचेतन स्थळाला आणि वस्तुंना चेतनत्व प्राप्त होतं ते तिथल्या माणसांमुळे, प्राण्यांमुळे आणि निसर्गामुळे. माणसांचं वागणं, बोलणं, पहाणं, ऐकणं यांच्याबरोबरच माणसांच्या नीती-अनीतीच्या संकल्पनांतून मूल्ये, श्रद्धा, श्रेयस, नैतिकता या सारख्या दृष्टिकोनातून, धडपड, संघर्ष, स्पर्धा, आकांक्षा, स्वप्ने, कला, सौंदर्य, वासना, सूड, राग, लोभ, द्वेष, चीड, तडफड, मळमळ, संताप, अघोरीपणा, दुष्टपणा, क्रौर्य, खून, लबाडी, लंपटपणा, मान्यामान्या, खुनशीपणा सारख्या भावना विकारांतून, आदर्शवाद, तत्त्व, निष्ठा, श्रद्धा या सारख्या तत्त्वांतून, मरण, क्षणभंगुरत्व, असाफल्य, निराशा, वैराग्य, वैताग यासारख्या अस्थिर करणाऱ्या विचारांतून संवेदना निर्माण होते. हीच माणसे निर्जीव स्थळांना, मुक्या प्राण्यांना आणि निसर्ग जीवनाला सचेतन करीत असतात. त्या सगळ्यांची मिळून एक संवेदना होते व ती अचेतनत्वाला चैतन्य देत असते. साहित्यकृतीला हीच संवेदना परिणाम प्राप्त करून देते. कथनामधल्या पात्रांना, घटनेला, प्रसंगांना ही उभारी देते, उंची देते अथवा सपक, सपाटही बनवू शकते.

कथनामधलं 'स्थळ' याच माणसांमुळे सजीव होऊन आपली म्हणून एक स्वतःची संस्कृती निर्माण करते. या संस्कृतीशी समांतर धावणारी, चालणारी एक वास्तव 'स्थळ संस्कृती' असते. या दोन्ही संस्कृतींना भूत-भविष्य आणि वर्तमान असतं. वास्तव स्थळ संस्कृती प्रतिबिंब कलाकृतीतील स्थळ संस्कृतीत वास्तवरूपात पडतं तिथे कलाकृतीतली स्थळ संस्कृतीचं वास्तवदर्शी होते. जिथे हे प्रतिबिंब पडत नाही तिथे ती स्थळसंस्कृती उपरी राहते. वास्तव स्थळ संस्कृती उपरी ठरली की त्या कलाकृतीच्या संवेदना बोथट होतात.

स्थळ संस्कृती त्या त्या कथनामध्ये त्या त्या कथनाचे एक अपरिहार्य पात्र बनून येते तेव्हाच ती कथनात्मक साहित्यकृती त्या स्थळसंस्कृतीची संवेदना होते. कथनातले स्थळ जेव्हा फक्त घटना वा प्रसंग घडण्याचे वा पुढे नेण्याचे केवळ एक 'ठिकाण' म्हणून येतात तेव्हा त्या कोणत्याही स्थळ संस्कृतीचा चेहरा प्राप्त होत नाही. बिन चेहऱ्याची स्थळ संस्कृती असणारी कलाकृती सपक व सपाट होते. संवेदनाहीन होते.

'घाशीराम कोतवाल' या नाटकात पुणे हे स्थळ या महानगराच्या संस्कृतीचा चेहरा घेऊन तर येतेच, पण

घशीराम, नाना या पात्रांच्या बरोबरीने पुणे हे स्थळ एक पात्रच बनते आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संवेदना नाटकाला उंची प्राप्त करून देतात. 'बासूनाका' सारख्या कादंबरीत मुंबई मधली झोपडपट्टी मुंबईच्या बकाल संस्कृतीचे पात्र होऊन 'भंकस' करीत राहते. 'वैतागवाडी' सारख्या कादंबरीत घर शोधणाऱ्या आणि मिळवू इच्छिणाऱ्या महानगरातल्या सामान्य चाकरमान्यांची 'शोध संस्कृती' नायकाबरोबर पात्र होऊन घराचा शोध घेते आणि वैतागून निराशपणाच्या संवेदनेत गुरफटून जाते. भाऊ पाध्ये यांच्या सर्वच कथांमध्ये, कादंबऱ्यांमध्ये मुंबईसारख्या महागनगराच्या संस्कृतीला आणि संवेदनांना अपरिहार्य असे स्थान आहे. भाऊंच्या कलाकृती महानगराच्या कथा होतात. श्री. ना. पेंडसे यांच्या 'लव्हाळी' तली चाळ संस्कृती मुंबईच्या चाळ नावाची स्थळ संस्कृती होऊन एक पात्रच होते. पु.लं. च्या 'बटाट्याची चाळ' मध्ये तर पुलंनी उघडउघडपणे चाळीला पात्रच केले आहे हे त्यातील शेवटच्या चिंतनावरून लक्षात येते. तरीही तिथे मुंबईच्या चाळ संस्कृतीच्या संवेदना प्रभावीच राहतात. अशोक शहाणे यांनी अनुवादित केलेल्या शंकर यांच्या कादंबऱ्यातले कलकत्ता सारख्या महानगरातले 'अरण्य' जनता होऊन घुसमटवून टाकते. त्या गर्दीत महानगराचाच जीव कोंडतो. नारायण सुर्वे यांच्या कवितेतही या महानगराची धमनी जी कामगार वस्ती तिचे उघडे रांगडे जगणे प्रतिबिंबित होत राहते आणि वेदनेची संवेदना ठसठसत राहते. नेमाडेसारखा कादंबरीकार मुंबईतील हॉस्टेल नावाच्या संस्कृतीला आणि शैक्षणिक स्थळांना, साहित्य-सांस्कृतिक घटनांना महानगराच्या विशाल पसाऱ्यात अर्थ देऊ पहातात. 'राडा', 'मुंबई दिनांक' सारख्या कादंबऱ्या मुंबई महानगरातलं गलिच्छ राजकारण मांडून महानगरालाच वेठीस धरणाऱ्या 'मोठ्या' बेरक्या माणसांची संस्कृती अधोरेखित करतात. अशी यादी वाढवता येणे शक्य आहे.

कोणत्याही महानगराचे स्थळ प्राप्त होणारी कलाकृती जेव्हा त्या महानगराची कथा होते तेव्हा त्यातील संवेदना गतीशील होतात, आणि जेव्हा त्या कलाकृती महानगरातील कथा होतात तेव्हा त्यातील संवेदनांना शैथिल्य प्राप्त होते. मराठीत महानगराच्या कथा फारच अल्प आहेत, महानगरातील कथाच विपुल प्रमाणात दिसून येतात. 'कथानक महानगरात घडते' या पलिकडे त्यातील महानगराला विशेष वेगळे असे स्थान लाभत नाही. त्यामुळेच त्यातील संवेदना या महानगरीय संवेदना होऊ शकत नाहीत. घटनाप्रधान ढाचा प्रमुख मानला गेल्याने महानगर हे केवळ 'स्थळ' म्हणूनच येते. अशा घटनाप्रधान कलाकृतींतून निर्माण होणाऱ्या माणसांच्या संवेदना कितीही तीव्र असल्या तरी महानगरीय संवेदनांच्या बाबतीत त्या तोकड्या पडतात, कारण माणूस आपल्या भोवतीच्या 'स्थळ' नावाच्या अवकाशाला टाकून देऊच शकत नसतो. हे अवकाश त्याचे एक अपरिहार्य असा जीवनाचा भाग झालेला असतो. ते स्थळ जर काहीच बोलत नसेल, मुके असेल, किंवा केवळ पडद्याप्रमाणे मागे उभे असेल तर ते वास्तव संस्कृतीला आणि मूलभूत संवेदनेला धरुन नसते आणि म्हणूनच अशा घटनाप्रधान कथनातल्या महानगरीय संवेदना बोथट आणि गुळगुळीत राहतात.

### मधु मंगेश कर्णिक

मधु मंगेश कर्णिक हे १९५० नंतरच्या कालखंडातले विनीचे लेखक आहेत. त्यांचे साहित्य विपुल आहे. ३६-३७ च्या वर कथा संग्रह, निवडक कथांचा संग्रह, १०च्या वर कादंबऱ्या, ललित लेखन, व्यक्तिचित्रे, नाटक, कविता, अनुवाद आणि लघुउद्योगासारख्या विषयावरील लेखन असा त्यांचा विशाल लेखन पट आहे.

'कृष्णाची राधा' ही त्यांची पहिली कथा १९५१ साली प्रकाशीत झाली. तेव्हापासून आजपर्यंत त्यांचे कथालेखन चालूच आहे. १९५८ साली त्यांचा पहिला कथा संग्रह (कोकणी ग वस्ती55) प्रकाशित झाला. 'देवकी' या कादंबरीपासून 'संधिकाळ' पर्यंतचा दीर्घ असा कादंबरी लेखनाचा त्यांचा प्रवास आहे. त्यांच्या

साहित्यातील 'महानगरीय संवेदने' चा शोध घेताना सूर्यफूल (१९६६), माहीमची खाडी (१९६९), सनद (१९८५), संधिकाल (१९९९) या कादंबऱ्यांचा आणि 'पांघरूण' (२००१) या कथासंग्रहाचा आधार घेतला आहे. 'वारूळ' ही कादंबरी उपलब्ध होऊ शकली नाही.

'सूर्यफूल' सारख्या कादंबरीत पांगळ्या झालेल्या छोट्या मुलाचा आणि त्याच्या आजोबांचा जीवनप्रवास, धडपड प्रमुख घटक असला तरी महानगराच्या चाळ संस्कृतीचा स्थळ अवकाश या घटकाच्या मागे आहे. 'माहीमची खाडी' ही तर प्रख्यात कादंबरी आहे. झोपडपट्टीच्या संस्कृतीचे स्थळ हे प्रधान वैशिष्ट्य या कादंबरीत येते. 'सनद' या कादंबरीत प्रशासन संस्कृतीने अवकाश व्यापून टाकला आहे. 'संधिकाल' ही त्रिखंडात्मक मोठी अशी कादंबरी. मध्यमवर्गीय संस्कृतीचा जीवनाविष्कार यात येत असला तरी महनगरीय स्थळ अवकाश तिच्या पार्श्वभूमीवर आहे. या चारही कादंबरीत येणारे महानगर 'मुंबई' हेच शहर असले तरी त्या प्रत्येकातील संवेदना कादंबरीनुसार बदलत जाते. 'पांघरुण' हा कथासंग्रह असल्याने त्यात वैविध्य आहे. एकच एका स्थळाचा तिथे अभाव आहे आणि ते योग्यच आहे.

## दोन

प्रथम त्यांच्या कथासंग्रहाचाच विचार करू या. एकूण २० कथा यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. या संग्रहातील काही कथा थेट महानगरीय संवेदनांना जन्म देणाऱ्या आहेत. उदा. 'त्रिधा राधा', 'भरत वाक्य', 'अनुबंध', 'हेलकावा' आणि 'अत्तरराणी'. 'गाज' या कथेत डोंबिवली सारख्या उपनगरीय संस्कृतीसह मुंबई महानगर उमटत राहते. 'शून्य' ही कथा अमेरिकेसारख्या परदेशीय संस्कृतीचा धसका घेऊन एका खेड्यात घडते. मुंबई या महानगराच्या जुजबी संदर्भ उमटवणाऱ्या कथाही या संग्रहात आहेत. उदा. 'तेजाब' नावाच्या संग्रहातील पहिल्याच कथेत रेणु मेहता अमेरिकेहून मुंबईत येते आणि काही दिवस मुंबईत राहून ती मणिशंकर यांच्या आश्रमात दूर खेड्यांत राहायला येते. रेणूच्या मुंबई वास्तव्याचा किंवा अमेरिकेसारख्या महाकाय शहराचाही कथेच्या दृष्टीने फारसा उपयोग कथाकाराने करून घेतला आहे असे दिसत नाही. आश्रमातील मोकळे विचार व राहणीमान पाहून तिला अमेरिकेची आठवण येते व 'अमेरिकेतही आपण असे मोकळे विचार ऐकले नव्हते.' असे तिला फक्त जाणवते. बस. त्यापलिकडे फारशा संवेदना निर्माण होत नाही. याच कथेत इला नावाची मुंबईची पत्रकार आश्रमात येते आणि आणखी थोडी मुंबई शहराची एक हालगज पत्रकारितेची संवेदना उमटते, पण तीही तेवढ्याच पुरती राहते. ती पेपरमध्ये मणिशंकरावरांवर लिहिते तरीही त्यातून फारसे काही घडत नाही.

'दंश', 'चेटूक', 'पिंपळ', 'भागधेय', 'मुलगा' या कथांमधून मुंबईसारखे महानगर डोकावते, पण स्थळा पुरतेच. 'दंश' मधली राणूबाई शिक्षणासाठी मुंबईत, अमेरिकेत असते व ती मुंबईहून जीप चालवत गावाकडे येते. इतकाच संदर्भ लेखक देतो व कथा राणूबाईच्या नदीच्या काठावरच तरंगत राहते. 'चेटूक' मधली सारिका मुंबईत तिच्या चित्रांचा शो भरवण्यापुरतीच शहराची आठवण काढते. बाकी कथा दूर ठिकाणी हॉटेलात घडते. विवाहबाह्य संबंधासारखा विषय असूनही, आर्ट सोसायटीच्या निवडणुकीसारखा विषय असूनही आणि चित्रकलेसारखे सर्जक वातावरण असून कुठेही महानगरीय संवेदनाचा ओरखडा त्यात येत नाही. विहंगचा मुलगा त्याच हॉटेलात उतरलेला असल्याने हा कलासमीक्षक अस्वस्थ असतो व त्यामुळे त्याचे चित्त थाऱ्यावर नसते, पण यात शहराचा काहीही भाग नाही. 'पिंपळ' मधला विश्राम मुंबईत राहात असतो व यशस्वी गायक होतो. दौऱ्याच्या निमित्ताने गावात येतो.

'भागधेय' कथेत मुंबईनगरी थोडी जास्त डोकावते. महालक्ष्मीच्या सिग्नलपाशी गाडीचे थांबणे

आणि पूर्वाश्रमीची मैत्रीण दिसणे. 'मुंबईबंद' च्या निमित्ताने (वैजू बोरिवलीला रहात असते.) वैजूचे दिवाणसाहेबांच्या घरी येणे होते. ती साहेबांच्या घरी रात्री रहाते आणि त्यांचे संबंध जुळतात. मुंबईच्या मल्टीनॅशनल कंपनीचे विश्व यात येते, सिक युनिटचे आव्हान पेलणारे दिवाणसाहेब येतात, पण यातून महानगरीय संवेदना निर्माण न होता कथा शरीर संबंधाचीच होते. दिवाणसाहेबांच्या पासून झालेल्या मुलीबरोबर, त्यांच्या पत्नीपासून झालेला मुलगा लग्न ठरवतो. हे दोघांनाही माहीत नसणे ही महानगराच्या पसाऱ्यामुळे लपून राहिलेली संवेदना ठरत नाही. 'मुंबई बंद' हा त्यांच्या संबंधासाठी येणारा एक नाममात्र योगायोग ठरतो. बाकी त्याला कथेत काहीच महत्त्व नाही.

'मुलगा' ही कथा कोकणातल्या खेड्यात घडली असली तरीही सुभष हा मुलगा नोकरी निमित्ताने वशिला लावण्याच्या निमित्ताने मंत्रालयात येतो. मंत्र्यांना भेटतो आणि तिथून घालवला जातो. मंत्री महाशय आपले वडील आहेत हे समजून चुकलेला सुभाष प्रश्नांचं काहुर घेऊन येतो. यात मुंबईचा संबंध फक्त भेटण्याचं स्थळ म्हणूनच येतो. घटनाप्रधानतेला अधिक महत्त्व असल्यानेच हे घडते हे उघड आहे.

'त्रिधा राधा', 'भरत वाक्य', 'अनुबंध', 'गाज', 'शून्य', 'हेलकावा', 'अत्तर राणी' या कथांना मात्र महानगरीय संदर्भ आहे व ते त्या नावक-नाकियांबरोबर महत्त्वाच्या संवेदना निर्माण करतात.

'त्रिधा राधा' मध्ये शिक्षिका आणि विद्यार्थी यांचा प्रेमसंबंध जुळून येतो तो रात्र महाविद्यालयाच्या व्यवस्थेमुळे. महानगरातील ही रात्र महाविद्यालयांची व्यवस्था ही कथनामधील उपरी वाटत नाही. शिवाजी पार्क, परळ सारखे संदर्भ असले तरी त्यांचा विशेष महत्त्व कथनाच्या दृष्टीने नाही. प्रौढ विद्यार्थी आणि शिक्षिका, प्रौढ विद्यार्थ्यांवर नोकरी करून शिक्षण पुरे करण्याची आलेली वेळ, कुटुंबाचा त्याच्यावर असणारा भार आणि या दडपणाखाली सोडून द्यावी लागणारी प्रेमाची संधी ही या महानगराची गोची रूपातील संवेदना आहे. या प्राध्यापिकेला आपल्या विद्यार्थ्याबरोबर लग्न करायचे आहे, परंतु ती त्याच्या बरोबर परळच्या पत्र्याच्या चाळीत नऊ भावंडासह जाऊ इच्छित नाही. त्याला आपल्याकडे रहायला बोलावते. (अर्थात राहूल ते अमान्य करतो.) मंजू राव या प्राध्यापिकेचा हा जो दृष्टिकोन आहे तो पूर्णपणे व्यक्तीकेंद्रित, आत्मकेंद्रित असा आहे आणि ही कोणत्याही महानगराची देण आहे, संवेदनाहीनता आहे.

'भरत वाक्य' ही कथा महानगरीय संवेदना असणारी आणखी एक कथा. भास्करराव आणि दत्तोपंत या दोन जुन्या जमानातल्या संगीत नाटकातल्या नटांची ही कथा असली व ती भूतकाळात रमणाऱ्या वृद्धांची गोष्ट असली तर त्यात खास महानगराच्या संवेदना स्पष्ट होतात. आयुष्यभर नाटकं केलेल्या भास्कररावांचा डॉक्टर मुलगा हरी तेवढी औषधे त्यांना देतो, पण नाटकाला घेऊन जाण्यासारखी मामुली बाब तो पूर्ण करू शकत नाही. महानगरीय वेगवान आयुष्य संस्कृतीच्या माऱ्याखाली ज्या सर्व वृद्धांची जी घुसमट होते, त्याचे एक बळी भास्करराव आहेत. नाटकाला नेऊ न शकणारी (मुलगा आणि) सून हक्काने मात्र तिच्या सोशल क्लबच्या नाटकाच्या उद्‌घाटनाला भास्कररावांना नेते. आपल्या स्वार्थासाठी उदोउदोसाठी. वस्तू म्हणून वापर करणारी ही महानगरीय संवेदना लक्षात येऊनही नाटकप्रेमी भास्करराव ते मान्य करतात. वृद्धत्वाने जावबंदी झालेल्या वेदनेला तेवढाच एक बदल प्राप्त होतो.

'अनुबंध' ही महानगरीय संवेदना व्यक्त करणारी या संग्रहातील अतिशय तरल अशी कथा म्हणावी लागेल. बँकेतील भ्रष्टाचारामध्ये फसवणुकीने अडकलेले नाना, त्यांची मुलगी नंदिनी, तिची आई आणि तिचा प्रियकर गिरीश यांची ही कथा आहे. आपले वडील (नाना) दोषी नाहीत यावर तिचा विश्वास आहे आणि तुरुंगातून शिक्षा

भोगून ते सुटणार आहेत. नानांची फसवणूक करणारे गृहस्थ खुद्द तिच्या प्रियकराचे वडीलच आहेत. व त्याच पैशांतून बांधलेल्या बंगल्यात लग्नानंतर राहायला जायचे असे गिरिश तिला सुचवतो. अर्थातच नंदिनी स्पष्ट सर्व सांगते आणि तिथे राहायला न जाण्याचे ठरवते. तिचा झगडा प्रेमातील संबंधांशी जसा आहे, तसाच किंबुहना त्याही पेक्षा जास्त प्रमाणात तिच्या आईशी आहे. तिची आई नानांना गुन्हेगारच समजते आहे. तुरुंगातून सुटून नानांनी घरी येऊ नये असे ती पत्र पाठवून नानांना कळवते. मुलीचे लग्न तिच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. विलक्षण स्वार्थी, आत्मकेंद्रित अशी ही महानगरीय संवेदना पतीला दूर लोटण्याचे कठोर, निष्ठूर कार्य करते. पतीवरचा 'आळ आम्हाला जन्मभर छळणार आहे' ही तिची व्यथा आहे. आपली सचोटी सिद्ध करू न शकणाऱ्या माणसाला जे भोगावे लागते ते नानांच्या वाट्याला आले असले तरी प्रेमाची नातीच पत्नीच्या रुपात संवेदनाशून्य आणि दगड होऊन जातात. शेवटी नंदिनी एकटीच नानांना घेऊन दूर निघून जाते. एकाच महानगरात राहणारी, एकाच घरात राहणारी तीन माणसे, पण पत्नीला हेच महानगर निष्ठूर बनायला भाग पाडते. चतुर गिरिशचे वडील मित्रत्वाचे नाते विसरून भोळ्या नानांना गुंतवतात आणि नानांना शिक्षा होऊनही गिरिश नंदिनीवर प्रेम करीतच राहतो. एकाच महानगरात त्रिविध संवेदनांची गुंफण लेखकाने मार्मिकपणे केली आहे.

'गाज' या कथेतही मुंबई शहर डोकावते. मुंबईच्या बँकेत नोकरी करणारा दिगंबर घोटाळा करतो आणि भ्रष्ट पैसा घरी आणतो. पोलीस धाड टाकतात आणि गायब होतो. तो परत येतच नाही. डोंबिवलीसारख्या उपनगरात राहणारे हे जोडपे आहे. शेवटी दिगंबरची पत्नी तिच्या सासुरवाडीला गावी जाऊन राहते. पुढील सारी कथा गावात घडते. या कथेतील पूर्वार्धात आलेल्या महानगरीय संस्कृतीच्या संवेदना संपूर्ण कथेला जन्म देतात. पैशाच्या हव्यासाचा, बिनश्रमातून, कष्टातून आणि विनासायास मिळणाऱ्या पैशाचा मोह दिगंबराला पडतो. ही हव्यास संस्कृती महानगराचे वास्तव आहे. इथे अवतीभवती राजरोस फसवणूक आहे. निष्ठांची, भलेपणाची, सचोटीची पायमल्ली होत आहे. सधन संस्कृतीशी जीवघेणी स्पर्धा आहे. अशा स्पर्धेच्या संस्कृतीपासून दूर राहणे न जमणारा दिगंबर स्वतःची आणि बायकोची फरफट ओढून घेतो. वणवण फिरत राहतो. अल्प प्रमाणात असली तरी महानगरीय हव्याससंस्कृतीची संवेदना या कथेच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे.

'शून्य' या कथेत मुंबईचा उल्लेख फक्त शशिकांत या नायकाचे आणि त्याच्या मोठ्या भावाचे शिक्षण पूर्ण करण्याचे स्थळ म्हणून केवळ येत असले तरी अमेरिकेसारख्या बलाढ्य संस्कृतीचा विळखा कथेच्या केंद्रस्थानी आहे. अमेरिकेत गेलेल्या शशिकांतच्या डोळ्यादेखत गुंड त्याच्या पत्नी होऊ इच्छिणाऱ्या प्रेयसीवर बलात्कार करतात व असहाय्य ठरलेला शशिकांत मानसिक धक्का बसून गावी परत येतो. पुढील कथा गावात घडते. 'गाज' या कथेतील उषा ज्या प्रमाणे महानगरीय संवेदनानी एकाकी होऊन गावात येते, तसाच शशिकांत महानगरातल्या एका आसुरी भोगवादी संस्कृतीचा फटका खाऊन, असहाय्य होऊन, कोसळलेल्या संवेदनांनी गावी येतो. या दोन्ही कथांतील पुढील घटनांना त्या त्या पात्रांच्या जीवनप्रवासाच्या विविध संवेदना प्राप्त होत असल्या तरीही त्याच्या उध्वस्त होणाऱ्या आयुष्याला कारणीभूत ठरतात त्या महानगरीय संवेदनाच.

'हेलकावा' ही या संग्रहातील महानगरीय संस्कृतीची संवेदना प्रसवणारी कथा म्हणता येईल. संपूर्ण कथेत मुंबई हे महानगर एक पात्र बनून वावरत राहते. हेमंत आणि अरुणा गावात लग्न झाल्यावर नशीब काढायला म्हणून मुंबईत येतात. मुंबईत येतात तेव्हा त्यांच्याकडे सामान ठेवायला जशी बॅग नसते, तशीच पाऊल ठेवायलाही जागा नसते, परंतु मुंबई सर्वांना सामावून घेते. सामावून घेणारी मुंबईची संस्कृती हेमंत-अरुणालाही सापडते आणि

जगवते. नुसती जगवत नाही तर यशाही पदरी टाकते. न लाथाडणारी ही मुंबई संस्कृती या जोडप्याला प्रस्थापित करते. मुंबई पुरुषाला यश देऊ लागली तरी ती त्याच्या मनाला व्यापक करतेच असे मात्र नाही. 'पुरुष प्रधान' संस्कृती मनातून क्वचितच पुसली जाते. हेमंत याला अपवाद ठरत नाही. अरुणाला दागिन्यांनी मढवणारा हेमंत तिचे कर्तृत्व मात्र दाबून टाकतो. मन मारून अरूणाही या शहरात जगत राहते. अकस्मात हेमंतला हार्टअॅटॅक येतो. शहरी धकाधकीचा हा परिणाम असतो हे उघड आहे. मुलगा परदेशी, मुलीचे लग्न झालेले असल्याने ती पुण्यात. अशा एकाकी अवस्थेत अरुणा स्वतंत्रपणे वेगळा व्यवसाय सुरु करते. या व्यवसायही 'वधू-वर सूचक मंडळा' चा असतो. या व्यवसायात तिचा जम बसतो. 'महानगरीय गरज' अरूणा आपल्या व्यवसायातून पुरी करत असताना तिलाच तिच्या एकाकी अवस्थेत पुरुषाचा आधार हवासा वाटतो. मुलीची संमती असते. व्यवसायामुळे स्थळ शोधणे सुलभही असते आणि अशाच एकाकी विधुर मेजरचे स्थळ तिला भुरळ घालते. होकार-नकाराच्या हेलकाव्यात सापडलेली अरुणा मेजरची वाट बघत बसते. पुरुषप्रधान संस्कृतीत जखडलेली आणि नंतर पंख प्राप्त झालेली स्त्री महानगरात उभी राहू शकते, महानगरी सगळ्यांना सामावून घेत असते, तशीच ती अरुणाला ही सामावून घेते. पुनर्विवाह सारखे पाऊल उचलायला सांगते. यश, पराधिनता, स्वतंत्र झेप, रूढीसंकेत झुगारून देणारा विचार या महानगरीय संवेदना या कथेत अगदी मार्मिकपणे व्यक्त होतात.

'अत्तरदाणी' ही कथा मुंबई महानगरात घडते आणि महानगराचीही काही प्रमाणात कथा होते. कामगार वस्तीतली चाळ संस्कृती स्थळ म्हणून या कथेत येते. नायक वृंदावन लेखक असतो. त्याची पत्नी जान्हवी त्याच्याबरोबर मुंबईत चाळीत संसार करत असली तरी तिला 'ही मुंबई काही आपली वाटत नाही' तिला वृंदावनला घेऊन पुन्हा गावी जायचंय. जान्हवी अडाणी आहे, कमी शिकलेली आहे, तिला वृंदावनच्या लेखनात स्वास्थ्य नाही. तिला फक्त त्याचे कष्ट दिसतात. लिहून लिहून हात दुखत असतील म्हणून हात चेपून देणारी ती गृहिणी आहे. त्याच्या दोन मुलींची आई. मिसेस वासंती बर्तक सेवळेकर या समीक्षा करणाऱ्या बाईशी वृंदावनची ओळख होते. सेवळेकर त्याच्या साहित्यावर फिदा आहे. त्यांची मैत्री वाढते. प्रेम अंकुरते. पंचतारांकित हॉटेलात ती वृंदावनला नेते. तिथले रीतीरिवाज माहित नसणाऱ्या वृंदावनला किटलीतला चाह जमत नाही. पंचतारांकित हॉटेल ही या कथेतील दुसरी स्थळ संस्कृती. चाळीत आणि लेखनात रमलेला लेखक त्या संस्कृतीत उपरा ठरतो. जान्हवीला त्यांचे प्रेमसंबंध लक्षात येऊनही ती समंजसपणे आणि नवऱ्यावरील दृढ विश्वासाने या संबंधांकडे पाहते. गावाची ओढ ठेवून मुंबईत अलिप्तपणे वावरणारी जान्हवी, नवऱ्याच्या प्रेमसंबंधांकडे तितकीच अलिप्तपणे पहात राहते. मुंबई आपली वाटत नसतानाही जान्हवी महानगराच्या नावाने खडे फोडत नाही. किंवा तडकाफडकी नवऱ्याला गावी जाण्याचा निर्णय घ्यायला लावत नाही. नवरा नावाची 'अत्तरदाणी'. या महानगरीय संस्कृतीतही आपल्यापाशीच कायम राहील यावर तिचा विश्वास आहे. अत्तर भले उघडे पडले तरी किंवा काही प्रमाणात दरवळले तरीही.

'पांघरुण' या संग्रहातील रुद्र, लढाई, डाग, सायाची फुले, मृदुंग आणि पांघरुण या कथा गावात घडणाऱ्या आहेत. महानगरीय संवेदना विचार करीत असल्याने या कथांचा समावेश विवेचनात केलेले नाही. वर उल्लेख केलेल्या कथांमध्येही महानगरीय संवेदनाचाच विचार प्रामुख्याने केला आहे. याचा अर्थ असा की त्या कथांमध्ये इतर संवेदना व्यक्त झालेल्या नाहीत. उदा. 'डाग' या कथेत व्यक्त झालेली पुरुषप्रधान संस्कृती आणि मांड्यांवर दोन पांढरे डाग एका स्त्रीच्या वाताहातीला कसे कारण ठरतात. त्यातून होरपळणारी संवेदना व्यक्त कशी होते याचे मनोज्ञ वर्णन लेखकाने रेखाटले आहे. किंवा 'पांघरुण' सारख्या कथेत भोगवादी मोहाला बळी पडून ससेहोलपट करून घेणारी संवेदना विमलसारख्या नायिकेच्या

आयुष्यात रेखाटण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत.

**तीन**

आता मधु मंगेश कर्णिक यांच्या कादंबऱ्याकडे वळणे उचित ठरेल. कथेपेक्षा कादंबरीमध्ये 'स्थळ संस्कृती' ला विशेष महत्त्व लेखकाला द्यावे लागते. कादंबरीचा विस्तार, पात्रांची संख्या, घटनेतील वैविध्य आणि संख्या, कालपटाचा अवकाश यामुळे स्थळाला महत्त्व प्राप्त होत असते. प्रत्येक पात्राचे आणि घटनेचे म्हणून एक स्थळ असते व हे स्थळ त्या त्या पात्रांच्यामुळे कमी-अधिक प्रमाणात जिवंत होत असते. या जिवंतपणाच्या खुणा किंवा मोकळेपणाच्या खुणा काय सांगतात, त्यावर त्या संवेदनांची प्रतवारी, उच्चनीच्चता, मृदुता-कणखरता, संयम-लोभ, आपुलकी-तुसडेपणा, स्वार्थ, पराकोटीची सोशिकता, उथळपणा, लोभसता, अवलंबून असते.

कादंबरीचा पट मोठा असल्याने एकाच स्थळाभोवती विविध कालपटातील माणसे येतात, जातात, रमतात. स्थळात स्थित्यंतर होते, प्रगती होते, जुन्या खुणा नामशेष होतात. नव्या खुणा बांधल्या जातात, नवीन पिढी येते आणि स्थळांचा संदर्भ बदलतो. स्थळ हेच असले तरी त्याकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलतो. दोन स्थळांची तुलना होते, त्यातील काही स्थळे अधिक आकर्षित करतात, तर काही दुर्लक्षित राहतात. सातत्यने, अतिपरिचयाने स्थळांना महत्त्व उरत नाही. किंवा मुद्दाम लक्ष द्यावे असेही कोणाला वाटत नाही.

कादंबरीकाराला याचे भान ठेवावे लागतेच परंतु स्थळांना प्रतीकांचे, चिन्हांचेही महत्त्व प्राप्त झालेले असते, त्याचेही विस्मरण होऊ द्यायचे नसते. भिंतींना असणारा रंग, भिंतांवरचे घड्याळ, चित्र, दारावरची बेल, पाटी इत्यादी अनेकच वस्तूंमधून विशिष्ट संवेदनांना खोली, उंची व व्यापकता प्राप्त होत असते. गावातील चर्चचे शिखर व त्याचे पडणारे टोले, कावळ्याची काव काव, समुद्राचा आवाज, शाळेतील रिकामी बाकं, चाळीचा कुरकुरणारा जिना, गळणारी बाथरूम या पाईप, रस्त्यावर वाहणारे ड्रेनेजचे पाणी, ढासळलेला बुरुज अशा असंख्य प्रतीकांमुळे ती ती स्थळे काही संवाद साधू पहतात. संवेदना जाग्या करू पहातात. कादंबरीकार मोठ्या खुबीने त्या प्रतीकांचा, चिन्हांचा वापर करीत असतो. कादंबरीत तुलनेने या सर्व प्रतीकांना सामावून घेता येते. कथेत येत नाही असे नाही, परंतु कादंबरीत ते शक्यही असते व आवश्यकही असते.

कर्णिकांच्या कादंबऱ्यांचा विचार करताना प्रथम त्यांच्या 'सूर्यफूल' या कादंबरीचा विचार करू या.

प्रस्तुत कादंबरीतील स्थळांचा विचार केला तर काय दिसते? त्यात चाळ आहे, चाळीची गॅलरी आहे. विशूचे घर दोन खोल्यांचे, पुढे मागे गॅलरी. मागची गॅलरी रहदारीच्या रस्त्यावर आहे. क्रिकेटच्या मैदानावरची आठवण, उपचार करून घेण्याचे हॉस्पिटल, विसूची शाळा, पेन्शन कचेरी, रस्ते, व्हिक्टोरिया, हॉस्पिटलची बस, चित्रकलेचा स्टुडिओ, हॉटेलमधील फॅमिली रुम इत्यादी स्थळांचा त्यात समावेश झाला आहे. सारी स्थळं मुंबईतली आहेत.

'सूर्यफूल' या कादंबरीत विसू हा पोलिओमुळे पांगळा झालेला नववीतला मुलगा आहे. त्याचे वडील लहानपणीच वारलेत. आई, तो आणि आजोबा. इतकीच माणसे त्या जुन्या चाळीतील दोन खोल्यांत राहतात. त्याच्या आजोबांना ४३ रुपये निवृत्तीवेतन मिळते. आई शाळेत शिक्षिका आहे आणि आजोबाच त्याची देखभाल करतात. हॉस्पिटलमध्ये पाठीवर घेऊन जातात, आणतात. आजोबांची एकच वेडी आशा असते, किमान हा स्वतःच्या पायावर उभा राहील, कुबड्यांच्या आधाराने चालेल. परंतु ते शक्य होत नाही. डॉक्टरही उपचार थांबवतात. नातू-आजोबा हताश होतात. पुढे आजोबा अपघातात मरण पावतात. चित्रकार असणाऱ्या विसूला एका स्टुडिओत बोलावलेले असते. एक छोट्याशा कुटुंबात आणखी दोन व्यक्ती येतात. एक शेजारची सुमी. विसूची बालमैत्रिण.

आणि विसूच्या आईने ज्यांच्याशी पुनर्विवाह केलेला असतो ते गृहस्थ म्हणजे देसाई मास्तर. त्याच्या बालमैत्रिणीचे लग्न ठरते आणि काही तोळे सोनं कमी पडतं. विसू आपले पदक तिच्या वडीलांना देऊन टाकतो.

विविधप्रकारच्या संवेदना व्यक्त करणारी ही कादंबरी आहे. जिवाच्या आकांताने धडपड करणारे आजोबा, गतिमान जगात हलू न शकणारा त्यांचा नातू, स्वकेंद्रित, आपमतलबी, स्वार्थी विचाराने पछाडलेली त्याची आई, निर्मळ स्नेह आणि मदत करणारी बालमैत्रिण, मतलबी आणि शरीर सुखासाठी हपापलेल्या आईचा प्रियकर अशा या माणसांमधल्या नातेसंबंधांच्या संवेदना प्रसंगांतून व्यक्त होतात. या संवेदना महानगरीय संस्कृतीत विक्राळ रूप धारण करतात. इथली स्थळं संवेदनांना उंची प्राप्त करून देतात.

ही चाळ मुंबईतील आहे पण नेमकी गिरगाव, दादर मधील आहे असे नाही. त्याची गरजही नाही. चाळीची गॅलरी ही या कादंबरीत पात्र झाली आहे. जशी शेजारची सुमी ही  विसूची मैत्रिण आहे, तशी ही गॅलरी त्याची जीवाभावाची मैत्रीण झाली आहे. गॅलरीतल्या कुंडीतील गुलाब बहरले, चिमण्यांनी प्रत्येक कोपऱ्यातील जागा बदलली पण विसू आणि ही गॅलरी एकाच जागी खिळून आहेत. जशी गॅलरी इमारतीला सोडून जाऊ शकत नाही, तसाच विसूही गॅलरीला सोडून जाऊ शकत नाही. गॅलरी ही विसूचा आधार आहे. सर्जकतेचे निर्मिती स्थळ आहे. इथेच बसून काढलेल्या चित्राला सुर्वणपदक ही मिळतं. आजोबांची वाट पहात ही गॅलरी आणि त्यांचा नातू उदास बसून असतात. आईचे मित्र देसाई मास्तर घरात येतात तेव्हा गॅलरीचे दार आतून बंद होते आणि विसूच्या संवेदनांचा कल्लोळाचे दार गॅलरीत सताड उघडे होते, आणि गॅलरी एकाकी, असहाय्य विसूला आधार देते. गॅलरीतून दिसणारी रस्त्यावरची वर्दळ ही विसूच्या हालचालींचे स्वप्न होते. स्मृतींची चालना होते. विसूची ही गॅलरी त्याच्या स्थिर, एकाकी अवस्थेचं प्रतीक बनून कादंबरीत त्यांच्यासारख्या हळव्या, संवेदनशील कलावंताच्या मानसिक हेलकाव्यांच्या संवेदनाचं दर्शन घडवते.

चाळ संस्कृतीची पार्श्वभूमी या कादंबरीला असली तरी त्याचे जुजबी संदर्भ कादंबरीत डोकावतात. दारांतून डोकावणाऱ्यांची चाळकऱ्यांची वृत्ती, खाजगी आयुष्याची किंबहुना एखाद्या 'लफड्या' ची खबर काढण्याची उत्सुकता, कुणकुण लागलेली व्यक्ती आली आहे हे समजताच काहीतरी निमित्त काढून दार वाजवून अंदाज घेण्याची आवड अशा काही घटना व प्रसंगांमुळे चाळ संस्कृती कादंबरीत येते, परंतु ही वृत्ती अधोरेखित करणे हे या कादंबरीचा उद्देश नाही व ते योग्यच होते. संयमित असे हे दाखले चाळीला ठसठशीत मात्र करतात.

विसूवरती उपचार करणारे हॉस्पिटल मधले वातावरण, त्या तिथे येणारी लहान लहान मुलं, अपंगांच्या संवेदनानी हेलावून सोडतात. शाळेत दाखल करून घ्यायला नकार देणारे मुख्याध्यापक महानगरीय संस्कृतीतील कोरड्या वृत्तीचे प्रतिनिधी बनतात. विसूचे आजोबा पै पै वाचवून नातवाला 'व्हील चेअर' घेण्यासाठी धडपडतात आणि खुर्चीची किंमत काढायला 'कोटा' त जातात. या कोटातले दुकान, तिथले चकचकीत वातावरण आणि असणाऱ्या अफाट किंमती पाहून आजोबा महानगरीत आपण किती क्षुद्र आहोत, आपल्याला कवडीमोलाचीही किंमत नाही हीच भावना घेऊन तेथून जातात. अफाट श्रीमंतीची एक दुनिया आणि त्याच महानगरातील एक गरीब, पापभीरू दुनिया एकमेकांपासून कित्येक मैल दूरच असतात. या श्रीमंतीचा ओहोळ या चाळसंस्कृतीकडे येऊ शकत नाही, येऊ शकणार नाही हे वास्तव भान ही कादंबरी देते.


(क्रमशः)

- प्रा. प्रदीप कर्णिक
फ्लॉवर व्हॅली, ३०१, टॉवर नं. १,

पुस्तक परिचय

# 'स्मृतिगंध' - प्रेरणादायी लेखसंग्रह

कै.डॉ.वा.ना. बेडेकर यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्ताने डॉक्टरांच्या आयुष्यात येऊन गेलेल्या अनेक व्यक्तींच्या मनातील डॉक्टरांच्या आठवणींना शब्दरुप देऊन त्या शब्दलेखांचा एक लेख संग्रह १४ एप्रिल २००५ साली प्रकाशित करण्यात आला. एकूण ३९ लेख असणाऱ्या या लेखांचे आप्तजनांच्या आठवणी व सुहृदाच्या आठवणी अशा दोन भागांत संपादकांनी विभाजन केलेले असल्याने घरच्या व्यक्तींच्या सहवासातील कुटुंबप्रमुख व सामाजिक क्षेत्रातले निष्ठा जपणारे डॉक्टर असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळे भाग वाचताना स्पष्ट जाणवतात. या लेखसंग्रहाचे संपादन श्री. अशोक चिटणीस, सौ. अल्पना बापट व डॉक्टरांच्या दीर्घकाळ सहवासात असणारे विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. मा. ना. पाटील यांनी केले आहे. डॉक्टरांविषयीचे हे लेख वाचताना इतरांना आलेले त्यांचे अनुभव व्यापकपणाने समजून, डॉक्टरांविषयी बरीच माहिती नसणारी मिळते हे तर आहेच, पण 'कर्मयोगी' असणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाबद्दलचा आपला आदर दुणावतो.




व्यक्तिलेख संग्रहात कॅलिडीस्कोपप्रमाणे अनेक अंशातून व्यक्ती उलगडत जाते. त्या व्यक्तीचे अनुभव, तिच्या सहवासातील व्यक्तिचे विचार वाचून खूप शिकायला तर मिळतेच, पण आपल्या वाटचालीत असे लेखसंग्रह प्रेरणादायी ठरतात. व्यक्तिविषयक लेखांचे म्हणूनच विद्यार्थ्यांनी वाचन करावयास हवे. आपला वैद्यकीय व्यवसाय एखाद्या धार्मिक निष्ठेने जोपसणारे डॉक्टर; आपल्या शिक्षणविषयक व सामाजिक कार्यात तन, मन, धनाने स्वतःस व्यस्त ठेवणारे डॉक्टर कितीही महत्त्वाचे काम असो, रात्रीचे जेवण कुटुंबियांसमेवत घेण्याचे व्रत कटाक्षाने पाळतात. आपला मुलगा, सून, जावई, मुली या सर्वांच्या जीवनातील साधे वाटणारे विषय, त्याच बरोबर महत्वाचे ठरू शकणारे निर्णय या सर्वांबाबत कुटुंब प्रमुख म्हणून आपले लागतेपण अगदी मनःपूर्वक जोपासतात. या संग्रहातील डॉक्टरांचे वडील म्हणून असणारे चित्र अतिशय हृदयस्पर्शी आहे. विमानप्रवासात आपल्या मुलांकडून त्यातील नॉट ॲट होम शिकणारे डॉक्टर, आपल्या मुलीने व जावयाने इंग्लंडमधून भारतात परतावे असे मनोमन वाटणारे डॉक्टर, मुलाला 'विजय, अभ्यास करतोयस ना ?' असे विचारणारे डॉक्टर... हे घरातल्यांचे लेख खरोखरच भारावून टाकणारे आहेत. विशेषतः शैलाताईंचा लेख तर इतका सुंदर आहे की बाप मुलीचे नाते व त्याचे पदर अलगदपणे या लेखातून उलगडतात. त्यामुळे शिक्षण महर्षी, जीवनव्रती असणारा हा माणूस आपल्या घरच्यांच्या बाबतीत किती जवळचा होता हे समजते.

कुटुंबाबाहेर समाजात काम करताना किती माणसे जोडली असतील याला हिशेबच नाही. श्री. मा.ना. पाटील यांच्या लेखातील भाऊसाहेब बांदोडकरांच्या भेटीचा किस्सा, डॉ. कुंटे यांच्या लेखात उल्लेख आलेले डॉक्टरांचे

(पान क्र.३६वर)

# परिसर वार्ता

## माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागाने माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान या विषयावर ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी व व्यावसायिक यांच्यासाठी पाच दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती.

दि. १६ मे ते २० मे या दरम्यान झालेल्या कार्यशाळेचे उद्‍घाटन विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांच्या हस्ते दि. १६मे रोजी सकाळी झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य स. वा. गोखले, मुंबई विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल व ग्रंथालय शास्त्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. शरद गणपुले उपस्थित होते.

दररोज चार या प्रमाणे पाच दिवसात झालेल्या सत्रांमध्ये संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोजन यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणावर भर देण्यात आला होता. यात प्रा. मोहन पाठक, डॉ. शरद गणपुले, ग्रंथालय शास्त्र विभाग प्रमुख प्रा. नारायण बारसे, डॉ. सावनूर, प्रा. चारुदत्त गणपुले, सौ. प्रियंका जोशी, सौ. मनीषा पाटील, श्री. दलवीर रील, श्री. माधव शिरवळकर इ. तज्ज्ञांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

समारोपाच्या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा.य. गोखले तर प्रमुख पाहूणे म्हणून अध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींना सहभाग प्रमाणपत्रे वितरित केली. आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना श्री. करंदीकर म्हणाले," असे शैक्षणिक उपक्रम राबविण्यास विद्या प्रसारक मंडळ महाविद्यालय यांच्या मागे उभे राहील. अशा प्रात्यक्षिकांना प्राधान्य देणाऱ्या प्रशिक्षण वर्गाची आज गरज आहे."

समारोप समारंभाचे आभारप्रदर्शन सौ. प्रियंका जोशी यांनी केले.

## संगणक आणि मराठी

'संगणक आणि मराठी' या विषयावर जोशी बेडेकर महाविद्यालयातर्फे दि. २८ जानेवारी २००६ रोजी एक चर्चा सत्र आयोजित करण्यात आले आहे. मराठी वा देवनागरीत टंकलेखन करताना अनेक प्रश्न निर्माण होतात. या चर्चा सत्रात या प्रश्नांच्या अनुषंगाने विषयाच्या विविध पैलूंचा सांगोपांग विचार केला जाणार आहे. या चर्चासत्राच्या दृष्टीने विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, लिपी व अक्षर विद्येचे अभ्यासक श्री. र. कृ. जोशी, औद्योगिक सल्लागार श्री. प्रकाश वैद्य, मराठी लेखन कोशाचे संपादक श्री. अरुण फडके, आय्.एल्.इन्फोटेकचे संचालक श्री. निनाद प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली कामाला सुरवात झाली आहे.

या चर्चासत्राच्या दृष्टीने पहिली कार्यशाळा रविवार दि. ८मे रोजी झाली तर दुसरी कार्यशाळा रविवार दि. २५ सप्टेंबर रोजी होणार आहे.

८ मे रोजी तंत्रनिकेतनाच्या सभागृहात झालेल्या कार्यशाळेचे प्रास्ताविक मराठी विभागातील प्रा. अनिल भावड यांनी केले. चर्चा सत्रामागील भूमिका सांगताना डॉ. बेडेकर यांनी भाषेच्या संदर्भात प्रमाणिकरणाला असणारे महत्त्व सांगून त्या दृष्टीने सदर प्रयत्न चालू आहेत हे स्पष्ट केले.

कार्यशाळेतील पहिल्या सत्रात बोलताना श्री. अरुण फडके यांनी शुद्ध लेखनाची शालेय व महाविद्यालयीन शिक्षण प्रणालीतील उपेक्षा होत असल्याबद्दल खंत व्यक्त करून सांगितले, मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने व प्रमाणीकरण साध्य करण्यासाठी

शुद्धलेखन ही पहिली गरज असेल.

श्री. निनाद प्रधान यांनी पुढील सत्रात संगणकाच्या उपयुक्त उपयोजनांची माहिती देऊन संगणक विकासातील महत्वाचे टप्पे तपशीलात स्पष्ट केले.

तिसऱ्या सत्रात बोलताना श्री. प्रकाश वैद्य म्हणाले, '' प्रमाणीकरणाला पर्याय असूच शकत नाही. सर्वसामान्य वापराकडून भाषा प्रामाणित वापराकडे कशी विकसित होते हे आपण पहावयास हवे.

चौथ्या सत्रात श्री. रा.कृ. जोशी यांनी प्रत्येक अक्षराच्या रचनात्मक स्वरूपाविषयी माहिती दिली. प्रश्नोत्तरांच्या तासानंतर सत्र संपले.

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांचे गट करून यासंबंधाने गट चर्चा घेण्यात आल्या.

**संगणक आणि मराठी :**

संगणकाने आपल्या जीवनामध्ये एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणली आहे. ज्ञान आणि माहिती ह्यांच्या प्रसारणामध्ये २०व्या शतकातील उत्तरार्धात झालेल्या संगणक तंत्रज्ञानाच्या विकासाची तुलना १५व्या शतकात झालेल्या मुद्रण क्रांतीशी होऊ शकेल.

ज्ञान आणि माहिती ह्यांच्या प्रसारणामध्ये मौखिक आणि लिखित या दोन्ही माध्यमांचा वापर जगामधील सर्वच सभ्यतांमध्ये दिसून येतो. जेव्हा या माध्यमांची व्यापकता वाढू लागते, त्यांचा वापर सर्वत्र आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये जेव्हा होऊ लागतो; तेव्हा ही माध्यमे प्रभावी करण्यात येतात. त्यांमध्ये अचूकपणा आणण्याकरिता अनेक युक्त्या, क्लृप्त्या आणि नियम बनवण्यात येतात. त्यातूनच उच्चारशास्त्र, ध्वनिशास्त्र, भाषाविज्ञान, व्याकरण यांची निर्मिती झाली. भारतामध्ये मौखिक आणि लिखित या दोन्ही माध्यमांचा वापर अत्यंत कल्पकतेने आणि प्रभावीपणे केलेला दिसतो. वेदपठण, मौखिक परंपरेतून वेदांचे पिढ्यानुपिढ्या केलेले जतन, आणि याकरता निर्माण केले गेलेले ध्वनी आणि भाषाविज्ञान हे मानवतेला भारताचे सर्वात मोठे योगदान आहे. लिखित माध्यमातून साहित्य निर्माण होते. हे साहित्य आणि त्यामधील आशय हा शतकानुशतके वाचकाला गम्य व्हावा म्हणून भाषा प्रमाणित करण्यात येते. संस्कृत भाषा आणि तिचे व्याकरण हेही भाषाविज्ञानाला भारताचे मोठे योगदान आहे. २००० वर्षांपूर्वी लिहिले गेलेले संस्कृत आणि आज लिहिले जाणारे संस्कृत यांमध्ये फरक असू शकेल तो फक्त प्रतिभेचा. जगातल्या सर्वच भाषांमध्ये जुनेनवेपणा असतो. जुनी भाषा अनाकलनीय होऊ लागते, यामुळेच कित्येक भाषा नष्ट होतात. कालक्रमानुसार संस्कृतमधले साहित्य जुनेनवे होऊ शकते. संस्कृत साहित्यनिर्मितीकरता वापरले गेलेले व्याकरण हे बहुतांशी बदलले न गेल्यामुळे इतर भाषांच्या साहित्यामध्ये दिसणारा जुनेनवेपणा संस्कृतमध्ये नाही. यामुळेच जगातला कुठलाही अभ्यासक संस्कृत व्याकरणाचा अभ्यास केल्यावर त्या भाषेवर प्रभुत्व मिळवू शकतो. भारतातील, विशेषतः उत्तर हिंदुस्थानातील, भारोपीय गटामध्ये अंतर्भाव झालेल्या सर्वच भाषा ह्या संस्कृतोद्भव आहेत. मराठीही त्याला अपवाद नाही.

भाषेचा विकास म्हणजेच संस्कृतीचा विकास. प्रत्येक शब्द हा अर्थवाही असतो. हा अर्थही अनुभवापासून फार दूर असू शकत नाही. समाज विकसित होऊ लागल्यावर त्याचे अनुभव आणि सांस्कृतिक जडणघडण व्यक्त करणारे अनेक शब्द निर्माण होऊ लागतात. आई, बहीण, मैत्रीण, पत्नी हे सगळे शब्द स्त्रीच्याच विविध सांस्कृतिक छटा दर्शविणारे आहेत. साहित्यामध्ये, कलेमध्ये त्याच्या संदर्भांना अनुरूप असेच शब्द वापरले जातात. वाचनाच्या सरावातून आणि शिक्षणातून हे शब्दभांडार वाढत जाते. हे शब्द + अनुभव

= अर्थ ही प्रक्रिया शतकानुशतके चालू असते. आणि म्हणूनच काही संस्कृत किंवा संस्कृतोद्भव भाषेमधील शब्द हे अनोळखी असले, तरी त्यांचा अर्थ जेव्हा कळतो तेव्हा ते जीवनानुभवाच्या सांस्कृतिक जडणघडणीच्या जवळचे वाटतात. अशा शब्दांच्या वापरातून सांस्कृतिक लयीचा भंग होत नाही. उलट साहित्यात असे शब्द वापरल्याने साहित्याचा सांस्कृतिक संदर्भ सुलभ होतो. भिन्न संस्कृतींच्या भाषांमधील देवाणघेवाण ही म्हणूनच फार सीमित असते. संगणक आणि मराठीचा विचार करताना भाषेच्या या सांस्कृतिक स्थानाचा विचार करणे म्हणूनच महत्त्वाचे आहे.

संगणक हे एक नवीन माध्यम आहे. जीवनातल्या सर्वच ज्ञानशाखा आज त्याचा वापर करताना दिसतात. गती आणि स्मरणशक्ती यांमध्ये मानवापेक्षा संगणक कितीतरी श्रेष्ठ ठरतो. संगणकाला स्वतःची भाषा नसते. त्याची भाषा असलीच तर ती आकड्यांची भाषा असते. संगणकाची भाषा इंग्रजी आहे ही सर्वांत मोठी गैरसमजूत आहे. तंत्रज्ञानाचीही आपली एक संस्कृती असते. मूलभूत विज्ञान आणि त्याचा वापर करून निर्माण केलेले यंत्र या दोन भिन्न गोष्टी आहेत. जो समाज किंवा जी संस्कृती मूलविज्ञानावर आधारित यंत्र विकसित करते, त्या समाजाच्या भाषेचा आणि संस्कृतीचा प्रभाव अशा यंत्रांच्या वापरावर पडतो. संगणक हे प्रामुख्याने पाश्चात्य देशांत विकसित झालेले तंत्रज्ञान आहे. साहजिकच संगणकावरील इंग्रजीचा प्रभाव हा त्यामुळेच आहे. जेव्हा तंत्रज्ञानाची उसनवारी केली जाते, तेव्हा आपल्या सांस्कृतिक भाषेमध्ये त्या तंत्रज्ञानाची परिभाषा निर्माण करणे गरजेचे असते. ही प्रक्रिया सोपी नाही. असा प्रयत्न हेतुपूर्वक करायला लागतो. हा प्रयत्न जेव्हा होत नाही, तेव्हा उसनवारी व्हायला लागते; आणि शुद्ध उसनवारीवर कुठलीच संस्कृती टिकू शकत नाही. उसनवारीची गरज हीच गुलामगिरीची एक सुरुवात असते. आणि गुलामगिरीची सवय ही भाषेच्या आणि संस्कृतीच्या खेचरीकरणाकडे वाटचाल करणारी असते. लोकसंख्या आणि भौगोलिक परिस्थिती ह्या दृष्टींनी सीमित असलेल्या फ्रान्स, जर्मनी आणि जपान या सर्वच संस्कृतींनी अशा तंत्रज्ञानाच्या विकासामध्ये त्यांच्या भाषेत परिभाषा निर्माण केली. म्हणूनच आज अशा यंत्रांच्या वापराकरता त्यांना इंग्रजीचे परावलंबित्व स्वीकारावे लागत नाही.

मराठी ही एक समृद्ध भाषा आहे. ती संस्कृतोद्भव असल्यामुळे परिभाषा निर्माण करण्याची तिची क्षमता खूप मोठी आहे. संगणक यंत्राचा वापर हा आपल्या संस्कृतीला सुसंगत करण्यासाठी, आणि भाषेला समृद्ध करण्यासाठी असेल; तर या तंत्रज्ञानाचे मराठीकरण करणे ही आजच्या काळाची गरज आहे. या प्रश्नाच्या यांत्रिक आणि तांत्रिक अशा अनेक बाजू आहेत. यांवर काम करणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्था एकत्र आल्यास हा कुटिल प्रश्न सोडवणे थोडे सोपे होईल. या प्रश्नांची ओळख करून घेणे आणि ते सोडवण्याकरिता सकारात्मक मानसिकता निर्माण करणे याकरताच हे चर्चासत्र आयोजित केले आहे. यामध्ये सर्वांनीच सहभागी व्हावे ही विनंती.

आपला नम्र,

डॉ. विजय बेडेकर

कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

---

**१) मराठी भाषेची वैशिष्ट्ये व इतिहास - मौखिक आणि लिखित**

**२) संगणक तंत्रज्ञानविकासाचा इतिहास**

- ☆ यंत्रभाग (Hardware)
- ☆ बुद्धिभाग (Software)
- ☆ संकल्पना (Design)
- ☆ रचना / स्थापत्य (Architecture)
- ☆ मूळ कार्यप्रणाली (Operating System)

- ☆ उपयोजन (Applications)
- ☆ उत्पादन व साधन (Products & Tools)
- ☆ गणपत्र (E-mail)
- ☆ गणपुस्तक (E-Book)
- ☆ प्रमाणीकरण (Standardisation)
- ☆ माहिती संपर्क तंत्रज्ञान (ICT)
- ☆ इत्यादी

**३) संगणक व मराठी मुद्रण**

**४) परिभाषानिर्मिती**

**५) विश्वसंकेत (Unicode) संकल्पना**

**६) संबंधित इतर विषय**

---

**शोधनिबंध -**

विषयसूचीतील कुठल्याही विषयावर अभ्यासक निबंध लिहू शकतील. लेखन व संदर्भासाठी प्रचलित संशोधन पद्धती उपयोगात आणावी. संस्कृत संदर्भ संपूर्ण असावेत. निबंधाच्या मुख्य अंगात संदर्भ अंक क्रमवार द्यावेत. मुळाक्षरे वापरू नयेत. पूर्ण संदर्भसूची निबंधाच्या शेवटी द्यावी. आकृत्या, चित्रे, आलेख, कोष्टक यांना क्रमांक द्यावेत व लगतच त्यांचे स्पष्टीकरण द्यावे.

निबंध एकाआड एक ओळींवर कागदाच्या एकाच बाजूच समास सोडून टंकलिखित करावा. निबंधाच्या २ प्रती पाठवाव्यात. निबंधसारांशाबरोबर लेखकपरिचय केवळ महत्त्वाच्या नोंदींचा अंतर्भाव करून पाठवावा. निबंधसारांशाविषयी सूचना सारांशपत्रात दिल्या आहेत. अस्वीकृत निबंध परत पाठविले जाणार नाहीत. परंपरागत निबंधवाचनाप्रमाणेच व्हिडिओ टेप, भित्तिपत्रे (Posters-56 x 71 cms), इत्यादी माध्यमांतून शोधनिबंध सादर करता येईल. अशा निबंधाचाही लेखी सारांश पाठविणे आवश्यक आहे.

शोधनिबंध व सारांश दिलेल्या कालमर्यादित पाठविल्याने परिषदेचे नियोजन सुकर होईल. दिलेल्या कालमर्यादित पोचलेले व स्वीकृत झालेले निबंध संकलित करून नोंदणीकृत सभासदांना परिषदेआधी ते मुद्रित स्वरूपात पाठविण्याची योजना आहे. या कामी आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**सारांश पाठविण्याची शेवटचा दिनांक :**
**३१ ऑगस्ट २००५**

**शोधनिबंध पाठविण्याची शेवटचा दिनांक :**
**३१ ऑक्टोबर २००५**

**चर्चासत्रपूर्व कार्यशाळा -**

संगणक आणि मराठी या विषयांवर या विषयातील तज्ज्ञ अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ८ मे २००५ आणि दिनांक २५ सप्टेंबर २००५ या दिवशी प्रत्येकी एक कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यशाळांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सभासदांनी अधिक माहितीकरता मंडळाशी संपर्क साधावा.

---

**नोंदणी -**

**प्रतिनिधिशुल्क :**

रु. ५००/- (३१ ऑगस्ट २००५पर्यंत)
रु. ६००/- (३१ डिसेंबर २००५पर्यंत)
रु. ७००/- (१ जानेवारी २००६पासून)

**विद्यार्थिशुल्क : रु. २००/-**

**शुल्क स्वीकृती :**

रोख / धनादेश / ड्राफ्ट / मनी ऑर्डर यांद्वारा

सर्व धनादेश/ ड्राफ्ट **'प्राचार्य, जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ठाणे'** या नावावर काढावेत.

**नोंदणी शुल्क परतावा :**

काही कारणास्तव नोंदणी रद्द करावयाची असेल तर दि. ३१ डिसेंबर २००५पर्यंत लेखी सूचना दिल्यास

७५% शुल्क परत करण्यात येईल.

**शोधनिबंधाचा सारांश पाठविण्याची सूचना**

**शोधनिबंध हा विषयसूचीतील विषयांशी संबंधित असावा.**

**शोधनिबंधाची भाषा :** मराठी, इंग्रजी

**सारांश :** सारांश ३५० शब्दांपर्यंत मराठी/इंग्रजीत असावा. त्यात शीर्षक, लेखक, संस्था, नगर, देश यांचा उल्लेख करावा.

**सारांश पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट २००५**

सोबत जोडलेल्या कागदावरच सारांश टंकलिखित करावा व त्या बरोबरच २ प्रती पोस्टाने पाठवाव्यात. लेखक परिचय सारांशाबरोबर पाठवावा.

(सारांश कृपया फॅक्सने पाठवू नये.)

**सारांशासोबत नोंदणी शुल्क पाठविणे आवश्यक आहे.**

---

**सौ. आनंदीबाई केशव जोशी मिडीयम स्कूल**

**आय.पी. एम्. परीक्षा २००५ चे निकाल**

| इयत्ता | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी | गुण |
|---|---|---|---|
| ५वी | १८ | प्रसादे वृषाली प्रदीप | ८४ |
| ६वी | ११ | देशपांडे अपूर्वा केतन | ६८ |
| ७वी | ७ | कारखानीस रुचा उमेश | १०० |
| ८वी | ६ | पडळकर अभिषेक दिलीप | ८६ |
| ९वी | २ | जोशी निखिल रविंद्र | १०० |

-संकलीत

(पान क्र. ३१वरून)

**स्मृतिगंध - प्रेरणादायी लेखसंग्रह**

ग्रंथ प्रेम, वसंतराव पेंडसे यांच्या लेखात उल्लेख आलेली ठाणे महाविद्यालय परिसरात भराव टाकण्यासंबंधीची माहिती हे सर्व अतिशय वाचनीय आहे. भारत सहकारी बँक, विद्या प्रसारक मंडळ, सत्कर्म प्रतिष्ठान इ. संस्था डॉक्टरांच्या मार्गदर्शनातून घडल्या. स्वाभाविकच त्यांचे उत्तुंग कर्तृत्व या संपूर्ण लेखातून आणवत रहाते. लेखकांनी त्यांच्या साठी वापरलेली विशेषणे मुद्दाम लक्षात घ्यावी अशी आहेत. सेवाव्रती, कर्मयोगी, देवदूत, अक्षुण्णव्रती, गरीबांचे धन्वंतरी, आधारवड, Visidnary इ. सर्व विशेषणे एकाच माणसासाठी वापरली गेली आहेत. यावरूनच त्यांच्या कर्तृत्वाची आभाळ भरारी समजते.

डॉक्टरांचे चिटणीस दांपत्याने शब्दांकन केलेले आत्मचरित्र १९९६ साली प्रकाशित झाले होते. त्यातील काही महत्वाचा मजकुराच्या चौकटी सदर लेखसंग्रहात पुनर्मुद्रित करण्यात आल्या आहेत तसेच डॉक्टरांचा जीवनपट (पृ. १३४) वर देण्यात आलेला आहे. काही दुर्मिळ छायाचित्रे पृ. ६६ व पृ. ६७ यांच्या मध्ये आपणास पाहता येतात. यातील भाऊसाहेब बांदोडकरांचे छायाचित्र तर दुर्मिळच आहे.

सत्कर्म प्रतिष्ठानने प्रकाशित केलेला हा लेखसंग्रह डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण, घडण समजावून घेण्यास उपयुक्त ठरेल असा झाला आहे.

**स्मृतिगंध** -अशोक चिटणीस, सौ. अल्पना बापट, मा. ना. पाटील (सं)
ठाणे, सत्कर्म प्रतिष्ठान, २००५
पृ. १३४ + छायाचित्रे मूल्य : रु. १००/-
पुस्तक हवे असल्यास संपर्क पत्ता : डॉ. बापट युरॉलॉजी सेंटर, अरुणकुमार वैद्य मार्ग, पांचपाखाडी, ठाणे (प.)
दूरध्वनी : २५३६ ६१३०

**- मोहन पाठक**